# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००९ |
| वर्ष | : | दहावे |
| अंक | : | ४ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १३९**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.
दिशा

वर्ष दहावे / अंक ४ / मार्च २००९

## संपादकीय

## शिक्षण आणि सामाजिक संस्था

जगातील आपले दैनंदिन जीवन व्यवस्थित चालावे यासाठी माणसाला किमान स्वार्थाची गरज असते, याबद्दल दुमत नाही. परंतु या स्वार्थाचा अतिरेक व्हायला लागला की, समाजरचनेवर त्याचे घातक परिणाम होण्यास सुरुवात होते. पाश्चात्त्य देशांमधील जीवनपद्धतींचे अंधानुकरण केले जात असल्याने आपल्याकडेही हा स्वार्थप्रेरित दृष्टिकोन वाढू लागला आहे, ही दुर्दैवाची बाब आहे.

व्यक्तिस्वातंत्र्य, स्वातंत्र्य ही मूल्ये महत्त्वाची आहेतच; पण जगभरच या संकल्पनांचा चुकीचा अर्थ लावला जाऊ लागला आहे. स्वातंत्र्याच्या भावनेवर विवेकाचे नियंत्रण नसेल तर स्वैराचार वाढतो. त्यातून सामाजिक जीवनाचा आधार असणाऱ्या मूल्यावस्थेची पडझड सुरू होते. यामुळेच पौर्वात्त्य जीवन पद्धतीत व तत्त्वविचारांत विवेकाला फार महत्त्वाचे स्थान आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचा चुकीचा अर्थ आणि आत्मकेंद्रित विचार करण्याच्या पद्धतीमुळे पाश्चात्त्य जगात आज सामाजिक प्रश्न तीव्रतर बनत आहेत व त्याचा परिणाम सर्वच जगात पहायला मिळत आहे.


शिक्षण, शिक्षण पद्धती आणि शिक्षणाची फलश्रुती या विषयांबाबत युरोपियन देशांमध्ये संबंधित घटकांत सातत्याने विचारमंथन चालते. सर्वेक्षण, परिषदा, अभ्यासगट अशा विविध माध्यमांतून संशोधन चालू असते. अशाच एका विचारमंथनामधील निष्कर्ष मांडताना बीबीसीच्या एका अहवालात 'स्वार्थप्रेरित प्रौढ बालपणाचा घात' करत असल्याबद्दलची निरीक्षणे आहेत. लहान मुले, विद्यार्थी हे उद्याचे भवितव्य असतील तर, सामाजिक ध्येयधोरणे, सामाजिक दृष्टिकोन यांमध्ये आमूलाग्र बदल केले जाण्याची गरज आहे. हा मुद्दा अहवालात मांडला आहे. पाश्चात्त्य देशांमध्ये विद्यार्थी व युवावर्गातील आत्महत्यांचे प्रमाण वाढत चालले आहे. अर्थात हे फक्त पाश्चात्त्य देशांपुरते मर्यादित राहिले नाही, हे दुर्दैवाने वास्तव आहे. जगभरच विद्यार्थ्यांमध्ये दिशाहीनता वाढत असल्याबद्दल काळजी व्यक्त होत असते. उपरोक्त 'गुड चाइल्डहूड एनक्वायरी' या अहवालात या संदर्भातील निरीक्षणे व निष्कर्ष मांडताना असे म्हटले आहे की, 'ब्रिटनमधील युवकांचे जीवन या पूर्वीच्या पिढ्यांमध्ये कधीही नव्हते, इतके कठीण बनत चालले आहे' या परिस्थितीत कारणीभूत असलले काही घटक म्हणजे,

(पृष्ठ क्रमांक ४० वर)



# स्वप्न साकारत आहे...

*हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,*
*हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे*
*हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे*
*नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे*
*ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,*
*सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !*
*हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,*
*ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे*
*हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,*
*न एके यामिनी*
*दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !*
*हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले*
*ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !*
*हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,*
*मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां*
*स्वप्न दिसे साकारले*
*आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -*
*ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण*
*द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान*
*ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,*
*दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.*
*भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,*
*शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती*
*मनी जे सुजाण,*
*दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,*
*ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,*
*बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,*
*उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.*
*युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी*
*स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई*
*आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती*
*विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,*
*कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,*
*इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान*
*भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती*
*शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती*
*नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे*
*सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.*
*बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,*
*विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां*
*नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार*
*स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार*
*नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,*
*बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा*




**वर्ष दहावे / अंक ४ / मार्च २००९**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १४ वे / अंक ९ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सुख मिळेल का ही बाजारी? | श्रीमती आशा भिडे | ३ |
| २) | मुलाखत : एका समर्पित कार्यकर्त्याची | श्री. मोहन पाठक | ६ |
| ३) | प्राचीन ते अर्वाचीन कालखंडातील भारतवर्षातील स्त्री-शिक्षण पद्धती आणि त्यांचे समाजातील स्थान | श्री. शं. बा. मठ | ९ |
| ४) | भारतीय संस्कृती -बीज, मॉडेल व साधना - उत्तरार्ध | श्री. यशवंत साने | १५ |
| ५) | वाचन व्यवस्थापन | प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये | १९ |
| ६) | जेष्ठाने आपली कुटुंब व्यवस्था कशी सांभाळावी | सौ. मोनिका दिलीप कुवर | २१ |
| ७) | पूर्व आणि पश्चिम | नरेन्द्र नाडकर्णी | २३ |
| ८) | ग्राम विकास - राष्ट्र विकास | श्री. शशिकांत गाणार | २८ |
| ९) | शांती | श्री. यशवंत माने | ३१ |
| १०) | निरोप समारंभ | मैत्रेयी शेवडे | ३३ |
| ११) | कोकण विभाग सार्वजनिक ग्रंथालय संघतालिका | प्रा. नारायण बारसे | ३४ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३६ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा

**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.४०० ६०२**

दूरध्वनी : २५४२ ६२७०

टीप : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) ''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा'' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

# सुख मिळेल का ही बाजारी?

*भारतीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भात साधा सोपा पण महत्त्वाचा विचार करणाऱ्या दिशाच्या जुन्या लेखिका श्रीमती आशाताई भिडे यांचा सुखाच्या संदर्भातील एक लेख - संपादक*

'सुख पाहता जवा पाडे दु:ख पर्वता एवढे' असे म्हणतात. सुख हे महाग आहे. ते कधीतरी, काही काळच वाट्याला येतं आणि तेही अगदी गुंजभर कारण महाग आहे ना म्हणून. दु:ख मात्र पसा पसा पर्वताएवढं. जीवनात दु:खाचे डोंगर उभे राहतात. त्यांना पार करून आयुष्य जगायला लागतं. जे वाट्याला येईल, समोर येईल, त्याला सामोरं जायला लागतं. संकटांशी सामना करावा लागतो. कधीतरी सुख आपल्या वाट्याला येणार आहे ह्या आशेवर माणुस जगत असतो आणि ते वाट्याला आले तर त्याला अत्तराच्या कुपी सारखे जपत राहतो. ते उडून जाईल, निसटून जाईल म्हणून.

पण सुख जीवनात आलं तरी माझ्या सुखाला कुणाची नजर तर नाही लागणार ना? खूप सुखानंतर दु:ख वाट्याला येणारच या कल्पनेनीच माणूस सुखाचाही आनंद पूर्णपणे उपभोगीत नाही. हा मनुष्य स्वभाव आहे. पर्वताएवढे दु:ख माणसाला सारखे दिसते पण जवाएवढे सुख त्याला सुखावीत नाही. महालात सात गाद्यांवर सुद्धा राजाला खालचा केस टोचतो. म्हणजे अत्यंत सुखाच्या वेळीही माणसाच्या मनाला कशाची तरी बोच खुपत असते. तर रस्त्यावर उन्हातान्हात काम करणारे मजूर जमिनीवर दगडाची उशी करून गाढ झोपी जातात. पैसेवाल्यांनाच पैसा कसा पचवायचा याची चिंता पोखरत असते. त्यामुळे त्या श्रीमंतीचे सुख लागत नाही.

जीवनातील जमेच्या बाजू आपण पहात नाही. वजाबकीचे गणित मांडतो नि दु:खी होतो. अर्धा ग्लास रिकामा आहे याचं दु:ख करण्यापेक्षा अर्धा तर भरलेला आहे ना हा विचार करावा. म्हणजे सुख समाधान लाभेल. घर शोधतो, तसे सुख शोधून मिळते का? ते शोधायचे असते का? सुखी माणसाचा सदरा किंवा सुखी बाईची चोळी ब्रह्मांडात तरी मिळेल का? गौतम बुद्धाने पाठवलेल्या गौतमीला कोणीच मृत्यू न पावलेल्या घरातल्या मोहऱ्या मिळाल्या का? नाही ना! रामदास स्वामींनी म्हणून ठेवलंय ना,

'जगी सर्व सुखी असा कोण आहे?

विचारी मना तू ची शोधून पाहे॥'

काम आणि क्रोध (इच्छा आणि राग) हे माणसाचे शत्रू आहेत हे गीतेनेच म्हटलेले आहे. माणसाला निरनिराळ्या इच्छा निर्माण होतात. एक इच्छा पुरी होत नाही तर दुसरी, तिसरी इच्छा मनात डोकावते आणि त्या पुऱ्या होईपर्यंत पुऱ्या झालेल्या कामाचा म्हणजेच इच्छेचा आनंदही तो पूर्णपणे घेऊ शकत नाही. या काम, क्रोध आणि लोभ ह्यांना नरकाची द्वारं म्हटलं आहे गीतेने. इच्छा पूर्ण झाली तर क्रोध फणा काढतो. बाईला नवऱ्यान एक दागिना केला की शेजारणीला किंवा मैत्रिणीला तीन चार दागिने आहेत. मला एकच, या विचाराने एक दागिना तर मिळाला ना याचा आनंद ही तिच्या मनाला होत नाही.

सुख हे शेवटी मानण्यावर आहे. सुखाच्या मृगतळापाठी धावण्यात काय अर्थ आहे? माणसाचे जीवन जिथे क्षणभंगूर अशाश्वत आहे, हे विश्वच तिथे शाश्वत नाही तिथे सुख तरी फार काळ कसे टिकणार? गौतम बुद्ध धर्माची तत्वे सांगून, ज्ञानेश्वरांनी गीतेवर टीका लिहून जगाला शाश्वत

---

मीपणामुळे विकल्प निर्माण होतात.

सुखाचा, परमात्म प्राप्तीचा मार्ग दाखवला. सुख बाह्य गोष्टीत नाही. तुमचे मन आनंदात असेल तर जग सुंदर भासेल जर मन दु:खी असेल बाह्य गोष्टीत रस वाटणार नाही. 'तुझे आहे तुजपाशी' पण व्यर्थ तू ते बाहेर शोधू पाहासी.

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

'सांगे कुमुद दलाचनि तारें।

जो जेविला चंद्रकिरणें चोखरे।

तो चकोरू काई वाळुवंटे।

चुंबितु आहे॥५.१०७

जो कमळाच्या पाकळीच्या पानावर (ताटात) शुद्ध चंद्रकिरणांचे भोजन करतो तो चकोर पक्षी वाळवंटातील वाळू चाटीत बसेल का? जगातील यश, किर्ती, विषय, सुख, समृद्धी वगैरे सारखी ऐहिक सुख वाळूच्या कणांसारखी बेचव भासतात ज्याने आणखी काही तरी चंद्रकिरणांसारखे शीतल, स्वच्छ, सुंदर शुद्ध अनुभवलेले असते. अमृताची गोडी ज्याने चाखली तो गुळवणी घेईल का?

भारतीय तत्त्वज्ञानात ऐहिक सुखाला बंदी नाही. पण त्या सुखाच्या मर्यादा स्पष्ट करण्यात आल्या आहेत. गीतेत पहिला श्लोक 'धर्मक्षेत्रे' शब्दाने सुरू होतो व शेवटचा श्लोक 'ध्रुवा नीतिमर्तिमम'॥१८.७८ 'नीति' या शब्दाने समाप्त होतो. म्हणजेच भगवंताना म्हणायचे आहे की धर्म व नीती यात बसेल अशाच मार्गाने मनुष्याने सुख, वैभव व कीर्ती मिळवावी. या जगात सारेच क्षणिक आहे. इथे सूर्याला मावळण्याचा शाप आहे, चंद्र क्षयोगी आहे, सागराला मर्यादा आहेत. जन्माला मृत्यूचा शाप आहे. सुखाला दु:खाचा. यापेक्षा ज्या सुखानंतर दु:ख येत नाही असे सुख आपल्यात आत्मा रूपाने (प्रत्येकात) सतत जागृत असलेले, चैतन्यासारखे सतत तेवत राहणारे, कधीही न संपणारे, ओहोटी न लागणारे जे शाश्वत सुख त्याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न आपल्या तत्त्वज्ञानात सतत केला आहे. कुमुदिनीला लांबून सुद्धा चंद्र किरणांच्या स्पर्शाने आलिंगन सुख उपभोगता येते. आपल्यातला आत्मा व विश्वरूप परमात्मा एकरूप असल्याची जाणीव ज्याला झाली, त्याला साध्या सुध्या ऐहिक सुखाची काय किंमत वाटणार? अमृत ज्याने प्यायले त्याला रसांची गोडी वाटणार ? गीतेने 'सुख दु:खे समेकृत्वा लाभालाभी जयाजयौ।' सुखदु:खात समबुद्धी रहायला सांगितलेय. गुणातीत, स्थितप्रज्ञ म्हणजेच सुखदु:खाच्या पलिकडे गेलेलाच मोक्ष पदाला, परम पदाला पावतो असे म्हटलेले आहे.

वीज कितीही चमकली तरी तिने दिवस उजाडत नाही. ढगांची सावली कितीही पडली तरी उन, थंडी, पाऊस ह्यापासून वाचण्यासाठी माणसाला घरे बांधावीच लागतात असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. तसेच कायमस्वरूपी सुखाच्या आनंदाशी होऊ शकणार नाही. 'शारदेचिये चंद्रवक्रे मजी अमृतकण कोवळे ते वेचिती मने मवाळे चकोर तलगे' असे चंद्रकिरणांचे भोजन आहे ते बरं का महाराजा!

घर शोधायचं, वर शोधायचा तसं सुख शोधायचं! ती काय वस्तू आहे? प्राणी आहे? व्यक्ती आहे की प्रेक्षणिय स्थळ आहे शोधायला! म्हणून वेड्यासारखं शोधत सुटायचं! कोलंबसने अमेरिका शोधून काढली, वास्को-डी-गामाने हिंदुस्थान शोधून काढला. तस आपण सुख शोधायला निघालोय म्हटल तर ते हास्यास्पद ठरेल. सुख तुझ्या मनातच आहे. ते ही मानण्यावर आहे. कोणाला कितीही असले तरी ते अतृप्त, असमाधानीच असतात आणि काहींना थोडक्यात समाधान असते. कोणाचं सुख दुरवत असतं आणि कोणी दु:खातही सुख मानणारे असतात.

'मन चंगा तो कठोति में गंगा', Sound mind in a sound body. मन स्थिर, स्वस्थ असेल तर बाह्य गोष्टीत रस, आनंद, सुख वाटते. म्हणून 'ठेविले अनंते तैसोचि रहावे चित्ती असो द्यावे समाधान, वरच्यांकडे बघून दु:खी होऊ नका. महामानव बाबा आमटे म्हणतात, 'पायात जोडा उंची

आहे की साध्या आहे ते सोडा. देवाने मला पाय तर दिलेत ना! ज्या कुष्ठरोग्यांना पायच नाहीत त्यांचे काय! देवाचे आभार माना. स्वत:ला भाग्यवान समजा. यातच समाधान माना. आणखी सुख ते कुठले!

भोगापेक्षा त्यागातला आनंद फार मोठा आहे. तो एकदा अनुभवलात तर सुखाचे धनी व्हाल.

''लुकलुकता तो तारा, झुळझुळता हा वारा

अम्हा सांगती चला उठा रे मनी हाच निर्धार करा

दुसऱ्यांना सुखविण्यात आहे जीवनांत आनंद खरा''

भगवद् गीतेने सांगितलेला राजगुह्य सतमार्ग हाच खरा शाश्वत सुखाचा मार्ग आहे. ऐहिक सुखामागे धावणे हे मृगजळामागे धावण्यासारखे आहे. गीतेत भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात - कायेला सोडून छायेला आलिंगन देण्यासारखे आहे. गीतेचा निरच्प्रभ कर्मयोग हाच शाश्वत सुखाचा राजमार्ग आहे.

एक लक्षात ठेवा वेळ येईल तेव्हाच आणि नशिबात असेल तितकेच तुमच्या पदरी पडणार आहे मग त्याच दु:ख करत बसण्यापेक्षा स्वत:चे दु:ख विसरून दुसऱ्यांच्या आनंदात आनंद माना दुसऱ्यांच्या सुखात सुख माना.

परमचैतन्य गोंदोलेकर महाराज म्हणतात ह्या देहाला मी अमुक अमुक आहे असं समजतो म्हणून मी दु:खी होतो. सुख दु:ख ही देहाची आहेत. मी म्हणजे देह नाही. मी आत्मा आहे असं मानलं तर, देहाची दु:खं माझी नाहीत व सुखं ही माझी नाहीत. यासाठी आत्म्याला देहापासून अलग करा. देहकेंद्री न होता आत्मकेंद्री व्हा. साक्षीभावाने स्वत:कडे बघा. गीतेचाही हाच संदेश आहे. परमात्म प्राप्ती हेच शाश्वत सुख अंतिम सुख बाकी 'सर्वम् क्षणिकम्' असे गौतम बुद्धाने म्हणून ठेवलेय. कडू औषध जिभेला कडू लागते पण त्यानेच व्याधी बरी होते. जिभेला क्षणिक सुख देणाऱ्या पदार्थांमुळे व मिष्टांन्न सेवनामुळे आरोग्याची हानीच होते. सौम्य आणि सुयोग्य आहार विहार हीच सुख शांती समाधानाची गुरूकिल्ली आहे.

व्यक्ती तितक्या प्रकृती. त्यामुळे प्रत्येकाची सुखाची कल्पना वेगवेगळी. कोणाचं सुख कशात तर कोणाच सुख कशात! त्यामुळे ज्ञानेश्वरांनी -

'जो जे वांच्छिल तो ते लाहो। प्राणिजात।

असे पसायदान मागितले. आपणही असच म्हणूनया -

'सर्वेऽत्र सुखिन: सन्तु सर्वे सन्तु निरामया:।

सर्वे भद्राणि पशन्तु मा कश्चित् दु:ख मानुयात्॥

ॐ शांती: शांती: शांती:॥

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

●●●

## ❈ दिशा ❈

❈ वर्गणी **रु. २५०/-** वार्षिक (वर्गणी कोणत्याही महिन्यात भरता येते.)

❈ वर्गणी रोख/धनादेशाद्वारे/मनीऑर्डरने भरता येईल.

**❈ वर्गणी पाठवण्याचा पत्ता ❈**
संपादक, व्ही.पी.एम्. दिशा,
विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२, दूरध्वनी
२५४२६२७०

# मुलाखत : एका समर्पित कार्यकर्त्याची

*श्री. उत्तमराव जोशी यांनी डिसेंबरमध्ये आपल्या वयाची ६० वर्षे पूर्ण केली. त्यांच्या विविधांगी वाटचालीचा हा धावता परिचय - संपादक*

१९८२ - ८३ सालापासून आमच्या विद्या प्रसारक मंडळाच्या कार्यकारिणीत असणारे व सध्या कार्यवाहपदाची जबाबदारी संभाळणारे श्री. उत्तमराव जोशी यांनी गेल्या डिसेंबरात वयाची साठ वर्षे पूर्ण केली. ठाण्याचे सार्वजनिक, सांस्कृतिक, शैक्षणिक जीवन यांना आकार देणाऱ्या कार्यकर्त्यांची जी नावे आहेत, त्यात सदैव कार्यमग्न असणाऱ्या व समर्पित भावनेने काम करणाऱ्या श्री. उत्तम जोशी यांचे नाव फार वरचे आहे. त्यांचा जनसंपर्क आणि संस्था संबंध मोठा आहे, तसाच त्यांच्या कार्यक्षेत्राचा विस्तार व आवाकाही विविधतापूर्ण आहे.

श्री. उत्तम जोशी ज्या घरात वाढले ते जुन्या ठाण्यातले त्यांचे घर हे संस्कार केंद्राचे स्वरूप असणाऱ्या त्या वेळच्या घरांतील एक होते. ठाण्यातील जुन्या मंडळींना जुना मुंबई आग्रा रस्ता, त्या रस्त्यावरील कृष्ण स्टोअर्स आणि या व्यवसायाचे शिल्पकार, त्यांच्या काळातील महत्त्वाचे सेवाभावी कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध असणारे (कै.) भास्कर सखाराम तथा छबुनाना जोशी माहीत नाहीत असे होणारच नाही. किंबहुना वयाने ज्येष्ठ असणारी मंडळी श्री. उत्तम जोशी यांना 'छबुनानांचा मुलगा' म्हणूनच आजही ओळखतात. कारण ठाण्याच्या इतिहासाला अर्थ प्राप्त करून देणाऱ्या त्या पिढीत छबुनाना हे महत्त्वाचे, संस्थारूप असणारे व्यक्तिमत्त्व होते. श्री. उत्तमराव व त्यांच्या सर्व भावंडांची जडणघडण झाली, ती त्यावेळच्या त्या संस्कारक्षम एकत्र कुटुंबामध्ये.

(कै.) छबुनानांचा संस्थासंबंधही मोठा होता. विद्या प्रसारक मंडळ, ब्राह्मण शिक्षण मंडळ, समर्थ भांडार अशा अनेक संस्थांत ते कार्य करीत. या निमित्त्याने गावातील अनेक कर्तृत्ववान मंडळींची घरात ये-जा होती. या कार्यमग्न वातावरणाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत श्री. उत्तमरावांची पिढी लहानाची मोठी होत होती. शिवाय त्या वेळी ब्राह्मण कुटुंबात साजरे होणारे सण, संपन्न होणारे धार्मिक विधी, पूजा अर्चा यांचे संस्कारही बालवयापासून होत होतो. आजोबा हे कुटुंबाच्या संस्कारशीलतेचे, भावनिकतेचे संगोपन करणारे महत्त्वाचे केंद्र त्या काळातील एकत्र कुटुंबात असे. नातवंडांना असणारा आजोबांचा लळा आणि आजोबांना असणारी नातवंडांची माया हा समृद्ध संस्कारांचा आशय होता. श्री. उत्तम जोशी व त्यांच्या भावंडांवरही त्यांच्या आजोबांनी केलेले संस्कार त्यांच्या जडणघडणीत फार महत्त्वाचे ठरले. आजोबांनी शिकवलेली स्तोत्रे, श्लोक, संस्कृत सुभाषिते, आर्या यांचा व त्यांनी सांगितलेल्या गोष्टींचा अमिट असा ठसा या भावंडांवर उमटत गेला या सुसंस्कृत, संस्कारक्षम वातावरणात श्री. उत्तमरावांना वाचनाची ओढ निर्माण झाली. शाळेत, घरात, मित्रपरिवारात आणि इतरांकडून माहीत झालेली चांगली चांगली पुस्तके मिळवणे, ती झपाटून वाचणे, यांतून त्यांची अभिरुची घडत गेली. न्यू इंग्लिश स्कूलमधील त्यावेळच्या शिक्षकांच्या शिकवण्याचा संस्कारही होत गेला. स्वत: पैसे खर्चून पुस्तके घेणे, ती वाचणे हा छंद वाढत गेला. आजही त्यांच्या वैयक्तिक संग्रहात हजार दोन हजार निवडक ग्रंथ आहेत. पहिल्यापासूनच कादंबऱ्यांपेक्षा कथा, चरित्र, आत्मचरित्रे व कविता त्यांना वाचायला आवडतात. या वाचनाच्या व्यासंगाचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत मोठा वाटा आहे.

घरातच व्यवसाय व घरातली सर्व मंडळी व्यवसायात काम करत. त्यामुळे शाळेचा वेळ वजा जाता व्यवसायात काम करणे, लक्ष घालणे हे लहान वयापासूनच होते. जन्मापासून ठाण्यात वाढल्याने, आपल्याला गाव का नाही, हा प्रश्न त्यांना पडत असे. त्यांच्या आजोबांकडून बागकामाची आवडही निर्माण झाली होती. पण रत्नागिरी जवळच्या गोळप या गावाचे आपले मूळ गाव असा उल्लेख केलेला ऐकायला मिळे. आज व्यवसायात स्थिरावल्यावर श्री. उत्तमरावांनी व त्यांच्या बंधूंनी गोळपमधील जागा विकसित करण्याचे काम चालू केले आहे. दरम्यान वाणगावला जागा घेऊन झाडे लावण्याची ओढ ही त्यांनी पूर्ण केली.

बालपणाबद्दल बोलताना कोणताही माणूस भारावतो. ते दिवस 'सोन्याचे' असतात. श्री. उत्तमरावांनी आपल्यावर संस्कार करणाऱ्यांचा उल्लेख करताना संघाच्या शाखेतल्या दिवसांचाही आवर्जून उल्लेख केला. आज डोंबिवलीत स्थायिक असणारे आबासाहेब पटवारी मूळचे ठाण्यातले. ते शाखा घेत. त्या शाखेतल्या मंतरलेल्या क्षणांच्या आठवणींचे ऋणही श्री. उत्तमराव व्यक्त करतात.

श्री. उत्तम जोशी हे निस्पृह व नि:स्वार्थी आणि समर्पित कार्यकर्ते आहेत. किंबहुना कार्यमग्नता हा त्यांचा स्थायी भाव आहे. त्यांचा जनसंपर्क व संस्थाप्रपंच पाहता हे लक्षात येते. विद्या प्रसारक मंडळाच्या कार्यवाहपदाबरोबरच, ठाणे भारत सहकारी बँकेचे उपाध्यक्ष पद, ठाणे भारत स्काउट संस्थेचे अध्यक्षपद, कोकण नागरी सहकारी बँक संघटनेचे कार्यवाहपद, श्री कौपीनेश्वर सांस्कृतिक न्यासाचे विश्वस्तपद ते संभाळत आहेत. ठाणे भारत सहकारी बँकेशी ते बँकेच्या स्थापनेपासून संबंधित आहेत. सहकारातून वनीकरण प्रकल्पासाठी बँकेला मिळालेल्या १० हेक्टर जागेत नंदनवन फुलवण्याच्या कामी त्यांचे योगदान मोठे आहे. स्काऊट गाईड संघटनेच्या इमारतीच्या उभारणीतही त्यांचा मोठा वाटा आहे. या अनेकानेक संस्थांच्या वेळोवेळी होणाऱ्या सभांना उपस्थित राहणे, या संस्थांच्या प्रगतीसाठी सातत्याने काम करणे आणि जनसंपर्क संभाळणे हे त्यांच्या सारख्या समर्पित कार्यकर्त्यालाच जमेल असे काम आहे.

आपल्या या जडणघडणीत आपल्या वडिलांप्रमाणेच शिक्षणमहर्षी कै. डॉ. वा. ना. बेडेकर आणि विद्या प्रसारक मंडळाचे विद्यमान कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे स्थान फार महत्त्वाचे असल्याचे ते सांगतात. डॉ. विजय बेडेकरांमुळे प्राच्य विद्या अभ्यास संस्था या वेगळ्या विषयात काम करणाऱ्या संस्थेशी त्यांचा संबंध आला, या विषयातील व्यासंग वाढला. प्राच्य विद्या अभ्यास संस्थेच्या देशातील व परदेशांतील सहलींत उत्तमराव सहभागी होते. या अभ्यास सहलींमुळे विषयाचा व्यासंग वाढण्याबरोबरच पूर्वीपासूनची प्रवासाची आवडही त्यांना पूर्ण करता आली व महत्त्वाचे म्हणजे 'या अनुभवांतून आपण समृद्ध होत गेलो' असे ते म्हणतात. प्राच्य विद्या अभ्यास संस्थेच्या स्थापनेपासून त्यांनी संस्थेच्या कामात योगदान दिले आहे.

शिक्षण आणि सार्वजनिक जीवन वेगळे करता येत नाही असे त्यांना वाटते. शिक्षणासाठी देणगी देताना पालक तक्रारी करतात, हे बरोबर नाही. समाजाचा महत्त्वाचा भाग असलेले जे शिक्षणक्षेत्र आहे त्यासाठी आपणही काही करावे, या क्षेत्राच्या प्रगतीत आपलाही खारीचा वाटा असावा असे त्यांना वाटत नाही. सार्वजनिक जीवनाबद्दलचे आपले निरीक्षण नोंदताना ते म्हणाले, 'स्वत:पुरते पाहण्याची लोकांची प्रवृत्ती वाढत चालली आहे. आपल्याला काही काम करता येत नसेल, करता येणे शक्य नसेल तर समाजासाठी सचोटीने जे काम करणारे आहेत त्यांना निदान मदत करावी. असे काम करणारांना कमी लेखणे, त्यांना हसणे याची उत्तमरावांना चीड आहे.

गेली काही वर्षे वर्षप्रतिपदेच्या दिवशी निघणाऱ्या शोभा यात्रेने ठाण्याच्या सांस्कृतिक जीवनात एक महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे. या शोभायात्रेत ठाण्याच्या सार्वजनिक जीवनातील विविध क्षेत्रांतील संस्थांचा महत्त्वपूर्ण सहभाग असतो. श्री कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यासातर्फे या शोभा यात्रेचे संयोजन केले जाते. श्री. उत्तमराव जोशी या न्यासाचे एक विश्वस्त आहेत.

या संदर्भात २००८ साली ठाणे भारत सहकारी बँकेच्या चित्ररथाची त्यांनी लिहिलेली व अनेक कलाकारांच्या प्रयत्नांतून साकारलेली नांदी ही उत्तमरावांची एक वेगळी व महत्त्वाची ओळख म्हणावी लागेल. या



नांदीची संकल्पना व लेखन त्यांचे आहे. या माध्यमातून ठाण्याच्या समृद्ध अशा सार्वजनिक, सांस्कृतिक जीवनाचा अतिशय कल्पक धांडोळा घेतला गेला आहे. ठाण्याची ही नेमकी ओळख व तिचे सादरीकरण, लेखन हे केवळ अप्रतिम आहे. श्री. उत्तम जोशींना असणारी ठाण्याच्या जीवनाची जाण, त्यांचा अभ्यास यातून आपल्याला समजू शकते.

कार्यरत राहणे हा त्यांच्या जीवनाचा आशय आहे. त्यामुळेच आपण स्वीकारलेले सार्वजनिक क्षेत्रातील काम आपला व्यवसाय संभाळत शक्य असेल तोवर नीट करत रहावे असे त्यांना वाटते.

विद्या प्रसारक मंडळाच्या 'दिशा' परिवारातर्फे त्यांच्या या आशयघन कर्तृत्वाला अभिवानद करून पुढील वाटचालीसाठी त्यांना लाख लाख शुभेच्छा!

मुलाखत व मुलाखत लेखन :

**मोहन पाठक, ठाणे**

●●●

## *गुणकारी लिंबू*

*मुबलक 'क' जीवनसत्व असलेल्या लिंबाचे अनेक उपयोग आहेत. पण सौंदर्यवृद्धीमध्ये लिंबू महत्त्वाचं काम करू शकत, हे अनेकांना माहित नसावं. नियमितपणे लिंबूपाणी प्यायल्याचे अनेक फायदे असतात. कोमट लिंबूपाणी प्यायल्याने वजन झपाट्याने घटवता येतं. शिवाय लिंबूपाणी शरीरातली सगळी विषारी द्रव्यं काढून टाकण्यास मदत करते. सकाळी उठल्यावर कोमट लिंबूपाणी प्यायल्याने पचनसंस्थेच्या कामाला गती मिळते. शरीरातले अनावश्यक घटक लवकर बाहेर टाकण्यसा लिंबू मदत करत. रक्त शुद्ध करण्यासही लिंबू उपयुक्त ठरत. तसच चेतासंस्था अधिक बळकट करण्यासही ते मदत करत.*

●●●

# प्राचीन ते अर्वाचीन कालखंडातील
## भारतवर्षातील स्त्री-शिक्षण पद्धती आणि त्यांचे समाजातील स्थान

*मार्चमध्ये आंतरराष्ट्रीय महिलादिन असतो, त्यानिमित्ताने स्त्री शिक्षणाबाबतचा हा लेख - संपादक*

**प्रास्ताविक :**

कोणत्याही समाजाची सांस्कृतिक पातळी ही त्या समाजातील स्त्रियांची परिस्थिती कशी आहे या वरून ठरते. त्या दृष्टीने वेद काळापासून भारतात स्त्रियांचे समाजात काय स्थान होते. त्यात चढ उतार कसे घडले व सांप्रत काय स्थिती आहे हे पाहणे आवश्यक आहे. या प्रदीर्घ कालखंडाच्या संक्षिप्त अवलोकनाने त्यात कशी स्थित्यंतरे झाली याचा बोध होईल.

**वेदकाळ :**

या काळात स्त्रियांचा दर्जा उच्च होता. आर्यांच्या देवता आढळून येतात. वैदिक सूक्तातून जवळ जवळ एकवीस सूक्ते ही उषा देवतेवर आहेत. या शिवाय इंद्राणी, सूर्या आदि देवतांचे वर्णनही आढळते. या सूक्तांतून त्या त्या देवतांची स्तुती आढळते. लक्ष्मीवर प्रसिद्ध श्री सूक्त असल्याचे आपल्यापैकी अनेकांना माहीत आहेच. शिवाय स्त्री तत्वाखेरीज देवताना देखील पूर्णता येत नसावी असे वाटते. अर्धनारी नटेश्वराची कल्पना त्यातूनच निघालेली आहे. इंद्राची पत्नी इंद्राणी हिला स्व सामर्थ्याचा अभिमान होता. शक्तीला संस्कृतमध्ये राची असे वेदकाळी म्हणत. म्हणून इंद्राला शचीपति असेही नाव आहे. त्याशिवाय लक्ष्मीनारायण, गौरीशंकर, सीता-राम, राधा-कृष्ण या जोड नावांनी हेच सूचित होत आहे की स्त्रियांचा दर्जा हा बरोबरीचा होता.

'अर्थो ह वा एष आत्मनो यत् जाया' हे शतपथ ब्राह्मणातील वचन स्त्रियांना दर्जा कसा पुरुष बरोबरीने असे हे दाखविते. धार्मिक अपात्रतेचा शिक्का स्त्रियावर याकाळी मारला गेला नव्हता. इतकेच नव्हे तर पुरुष जर अविवाहित राहील तर धार्मिक अपात्रतेचा शिक्का त्यांच्यावर मारला जात असे.' अयज्ञीय: वा यो अपत्नीक:। (शतपथब्राह्मण) पत्नी शब्दाची व्युत्पत्ती तिच्या यज्ञ कर्तव्याशी निगडित आहे. पत्युर्नो यज्ञ संयोगे (पाणिनी) या वरून पत्नीस यज्ञामधे महत्त्वाचे काम करावयाचे असे. यज्ञाचे वेळी तिचे व्रतोपनयन होत असे व नवऱ्याबरोबर तिलाही दीक्षा दिली जात असे. यजमान व त्याची पत्नी हे दोघेही बरोबरीने यज्ञात भाग घेत असत. असे वर्णन ऋग्वेदात आढळते. (या दंपत्ती सुमनसा सुनुति आ च धावत:। देवास्ते नित्य वाशिरा। (ऋ. ८-३१-५)

**स्त्री पुरुष अभेद :**

वेदकाळी स्त्रियांना मान होता. त्यांना पुरुषांप्रमाणेच स्वतंत्र असे बौद्धिक, अध्यात्मिक जीवन होते. या जीवनाला आवश्यक असे शिक्षण त्याना मुलांच्या बरोबरीने मिळत असे. मुलाप्रमाणे मुलींचेही उपनयन होत असे. (पुरा कलये तु नारीणां मौंगींबंधन मिष्यते। मनु) उपनयनानंतर त्यांच्या अध्ययनाला सुरुवात होई. वैदिक सूक्ते व नित्य नैमित्तिक कृत्याला लागणारी सूक्ते त्या मुखोद्गत करीत. पुरुषांप्रमाणेच त्या सकाळ संध्याकाळ संध्या करीत.

वेद मंत्राची व त्याच्या अर्थाची चांगली माहिती असल्याखेरीज वैदिक यज्ञामध्ये भाग घेणे शक्य नसे. त्या करता उपनयनाची जरूरी असे व याकाळी सामान्यत: सर्व स्त्रियांचे उपनयन होत असे. 'ब्रह्म चेर्यण कन्या युवानं विन्दते पतिम्।' या अथर्ववेद मंत्रावरून (११-५-१८) स्त्रिया

उपनयनानंतर बराच काळ अध्ययनामध्ये घालवीत. पण काही स्त्रिया पुरुषा इतके विद्या प्रावीण्य मिळवीत. त्याकाळी कित्येक विदुषी मंत्र द्रष्ट्या म्हणून नावारूपाला आल्या. त्यांची सूक्ते ऋग्वेदात समाविष्ट आहेत. वाङमय शिक्षणाबरोबरच स्त्रियांना गायन, वादन, नृत्य आदि ललित कलाही शिकवीत असत.

ब्रह्म वादिनी व सद्योव्दाहा असे विद्यार्थिनींचे दोन प्रकार होते. 'द्विविधा: स्त्रिया। ब्रह्मवादिन्य: सद्योन्दाहाच। तत्र ब्रहानादिनी नाम अग्नीधनं, वेदाध्ययनं स्वगृहे भैक्षाचर्येति।

**ब्रह्मवादिनी :**

या स्त्रिया आजन्म ब्रह्मचर्य पाळून वेद विद्येचा व ब्रह्म विद्येचा अभ्यास करीत. शिवाय स्वतंत्र लेखनही करीत. घोषा, विश्ववारा आदि विदुर्षींनी रचिलेल्या ऋचा ऋग्वेदात आढळतात. सुलभा, मैत्रेयी, गार्गी या आत्मज्ञान विषयक जिज्ञासेबद्दल प्रसिद्ध आहेत. विदेह जनकाच्या राजसभेत जी आध्यात्मिक चर्चा चाले त्या चर्चेत गार्गी प्रामुख्याने भाग घेत असे. तिने एका प्रसंगी तत्त्वज्ञ याज्ञवल्क्यांनाही वादात कुंठित केले. पुरुषांप्रमाणे स्त्रियाही अध्यापनाचा व्यवसाय करीत. त्यांना उपाध्याया अगर आचार्या अशी संज्ञा होती. त्या गुरुंच्या परवानगीने गुरुगृहीच राहत. तसेच जमल्यास मातापित्याकडे राहत.

**सद्यो व्दाहा :**

या विद्यार्थिनी सोळाव्या वर्षापर्यंत शिक्षण घेत. मग अनुरूप पतीशी विवाह करीत. पत्नी म्हणून तिचे स्थान उच्च होते. गृहस्थाला पत्नीवाचून यज्ञाचा अधिकार नसे. यज्ञात पत्नीचा फार मोठा वाटा असे. 'पत्नी कर्म एव वै ते कुर्वन्ति यत् उद्गावार:।' यज्ञवेळी सामगायन करणे हा स्त्रियांचा विशेषधिकार होता. यज्ञीय तांदूळ सडणे, कुटणे, यज्ञीय पशूला स्नान घालणे, यज्ञ वेदीच्या विटा रचणे ही कामे तिलाच करावी लागत. सूक्तकाळापर्यंत, साधारण पाचव्या शतकापर्यंत (ख्रिस्ताब्द) पती परगावी गेला असता पत्नी यज्ञ कर्म स्वतंत्र करीत असे. काही यज्ञ फक्त स्त्रियानांच करावयाचे असत. स्वतंत्र, सुबुद्ध अशा स्त्रिया आपल्या अपत्यांच्या सर्वश्रेष्ठ गुरू समजल्या जात. हजार शिक्षकापेक्षा पिता श्रेष्ठ, त्यापेक्षा हजार पटीने माता श्रेष्ठ गुरू समजली जात असे.

वैधव्य प्राप्त झाल्यास वेद काळातील स्त्रीला दुसरा अनुरूप तर निवडण्याची परवानगी होती. ऋग्वेदात पुनर्विवाहाचा उल्लेख आहे. (उदीर्षा नार्यभि: जीवलोकं गतासुमेतमुप शेष एहि। हस्त ग्राभस्य दीघिषोस्तवेदं पुण्युर्जनिलमभि सं बभूथ। ऋ. १०-१८-८ हे नारी उत्तिष्ठ अस्मात् स्थानात्। पणिग्राहं कुर्वत: संभूतासि तस्मात् आगच्छ। (सायण) तिला जर पुनर्विवाह करावयाचा नसल्यास तिचे जीवन कष्टमय होत नसे. तिला उत्तम विणकाम येत असे त्यातून तिची उपजीविका भागत असे.

**दर्जा खालावला :**

सूत्र काळात स्त्रीचा दर्जा खालावला. आर्यांची वस्ती वाढली. ते हळू हळू दक्षिणेकडे सरकू लागले. त्यामुळे संस्कृति संकर होऊ लागला. आर्यांच्या सांस्कृतिक जीवनात फरक पडत चालला. त्यांनी दक्षिणेकडील काही रीतिरिवाज स्वीकारले. स्त्रियांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा लोप होऊ लागला. त्यांच्या रक्षणाचा व भरण पोषणाचा भार पुरुषांनी स्वीकारला. स्त्रियांच्या अवनतीचे खरे कारण आर्येतर स्त्रियांशी विवाह करण्याची पद्धत सुरू झाली हे आहे. वेदकाळी त्रैवर्णिकांत परस्पर विवाह होत. पण आर्यांचे इतरांशी विवाह होत नसत. अनार्यांशी विवाह करण्याची प्रथा समाजात रूढ होत चालली. महाभारत कालीन भीम, अर्जुन यांचे विवाह हिडिंबा, डळुपी इत्यादींशी झाले याला विरोध झाला नाही. मात्र दु:ष्परिणाम कालांतराने दिसू लागले. अनार्य बायका आर्य गृहात आल्याने आर्य स्त्रियांचा

कर्तेपणाचा अभिमान केलेल्या कार्याचा नाश करतो.

दर्जा कमी होऊ लागला. अनार्य स्त्रियाना संस्कृत येत नसे त्यामुळे त्यांना वेदाधिकार वा यज्ञाधिकार देणे शक्य नव्हते. अनार्य स्त्रिया आर्यांच्या लाडक्या होऊ लागल्या. त्यामुळे अनाचार वाढू लागला. हा अनाचार टाळण्यासाठी काही स्मृतिकारांनी स्त्रियांचा वेदाधिकार काढून घेण्याचे योजले. जैमिनी, बादरायण आदि विद्वानांनी या गोष्टीला कसून विरोध केला पण यश आले नाही. विवाह कालही लवकर करण्यात आला. १३-१४ व्या वर्षी मुलीचे लग्न होऊ लागले. उपनयनानंतर त्यांना शिक्षणाला कमी वेळ मिळू लागला. त्यामुळे उपनयन हा निरर्थक संस्कार वाटू लागला. तो ठेवून तरी काय उपयोग असे वाटू लागले. स्त्रियांचे उपनयन करू नये, त्याना वेद शिकवू नयेत व इत्यादी मते प्रचलित झाली. या सर्वांचा परिणाम स्त्री शिक्षणावर झाला.

उपनयन संस्कार बंद झाले. स्त्री शिक्षणास मुकली. तसेच पुनर्विवाहावर बंधने घातली गेली. वैधव्य आले असता स्त्रीने संन्यस्त जीवन जगावे असे स्मृतिकार सांगू लागले.

**स्मृति व पुराण काळ :**

या कालखंडामध्ये पहिली तीन चार शतके मुलींचे उपनयन एक संस्कार म्हणून चालू होते. पण त्या नंतर वेदाध्ययन वगैरे होत नसे. वेद विहीन उपनयन हा चेष्टेचा विषय झाला. उपनयन हा एक शारीरिक संस्कार झाला. त्यात शिक्षणाचा अंतर्भाव नव्हता. वेदाधिकार नसला तरी स्त्रियांचे उपनयन अनावश्यक वाटू लागले. तेव्हा ते बंद केलेले बरे, असे तिसऱ्या चवथ्या शतकात समाजाला वाटू लागले. या संस्काराला आता काळ अनुकूल नाही असे स्मृतिकार म्हणू लागले. पाचव्या शतकापर्यंत तो निरर्थक संस्कार म्हणून चालू राहिला.

उपनयन बंद पडल्यामुळे प्राथमिक शिक्षणावरही परिणाम झाला. प्राथमिक शिक्षणाची देखील हेळसांड होऊ लागली. उपनयनामुळे थोडे फार शिक्षण होत असे. वेद मंत्र नीट म्हणता यावेत म्हणून मुलींना लेखन, वाचन, व्याकरण इत्यादि प्राथमिक शिक्षण दिले जात असे. तो संस्कारच नाहीसा झाल्याने विवाह काळ मर्यादा अलीकडे ओढण्यात आली. त्यामुळे शिक्षणावर आणखी परिणाम झाला. काही स्मृतिकार म्हणू लागले. मुलीचे विवाह रजोदर्शना पूर्वी केले जावे, नाही तर पालकाना भ्रूण हत्ये सारखे घोर पातक लागते. होता होता उपनयन आठव्या वर्षी होत असल्याने स्त्रीचे लग्न आठव्या वर्षीच करावे असा मत प्रवाह सुरू झाला. १२ - १३ वर्षापर्यंत विवाह काळ होता तो पर्यंत मुलीना लेखन वाचन वगैरे शिकवून वाङमयाचीही ओळख करून देत. त्यामुळे काही स्त्रिया प्राकृत भाषांचा विशेष अभ्यास करीत. कविता करीत. गाथा सप्तशतीवरून या गोष्टी दिसून येतात. रेता, रोहा, माधवी, अनुलक्ष्मी, पाहई, शशिप्रभा इत्यादी कवियित्रींच्या कविता वरील ग्रंथात हालाने उद्‌धृत केल्या आहेत. काही स्त्रियांनी संस्कृतमध्ये ग्रंथ रचना केली. भाषाशैलीबद्दल शीलभट्टारिका नावाच्या कवयित्रीची रव्याती होती. 'शद्बार्थयो: समोगुंफा पांचाली रीतिरूच्यते। शीलभट्टारिका वाचि। (राजशेखर) शृंगाररस प्रधान मनोहर कविता करण्याबद्दल गुजराथ मधील देवी नावाची कवयित्री प्रसिद्ध होती. 'सूक्तीनां स्मरकेलीनां कलानांच विलासभू:। प्रभुर्देवी कविलाही गतापि हृदितिष्ठति। (राजशेखर) ती मेल्या नंतरही लोकाना तिची आठवण येत असे. इतकी ती लोकप्रिय होती. वऱ्हाडमध्ये विजयांका हिची कीर्ति कालिदाससमान होती.' सरस्वतीव कर्णारी विजयांकाजयत्यसौ। या वैदुर्भगिरांवास: कालिदासादनंतरम्। (राजशेखर) राजशेखर यांनी तिची सरस्वतीशी तुलना केली आहे. काही स्त्रिया वैद्यकाचाही अभ्यास करीत. वसा नावाच्या स्त्री वैद्याने स्त्री रोगावर एक पुस्तक लिहिले. आठव्या शतकात त्याचे आरबी भाषेत भाषांतर झाले मात्र त्या विदुषीचे पुस्तक आज उपलब्ध नाही. नवव्या शतकानंतर आठव्या वर्षी मुलींची लग्ने होऊ लागली. मुली अशिक्षित राहिल्या.

**बौद्धकाळ व मोगलशाही :**

सन पूर्व पाचव्या शतकात बौद्ध धर्माचा उदय झाला. हिंदू धर्माचा पाया आणखी ढासळला. या नंतर १५ व्या शतकापासून मोगलांच्या स्वाऱ्या सुरू झाल्या. जवळ जवळ ६०० वर्षे त्यांचा अंमल हिंदुस्थानावर होता. मुसलमानी अमलात साक्षरतेचे प्रमाण भराभर कमी होऊ लागले. राज्य क्रांतीमुळे संपन्न व सुसंस्कृत कुळे धुळीस मिळाली त्या कुळात मुलींना खाजगी शिक्षण देण्याकरता शिक्षक मिळेनासे झाले. सार्वजनिक शिक्षणाची सोय नव्हतीच. सामान्यत: स्त्रिया अशिक्षित राहिल्या.

स्त्रिया जरी साक्षर नव्हता तरी अशाही परिस्थितीत सामान्य स्त्री समाज असंस्कृत होती असे म्हणता यावयाचे नाही. पुराणांच्या द्वारे हिंदुसंस्कृतीचे ज्ञान बहुजन समाजास लोक भाषेतून देण्याची प्रथा बद्धमूल होऊ लागली होती. त्यामुळे धर्मनीति तत्त्वज्ञान व प्राचीन संस्कृति याचे ज्ञान निरक्षर लोकातही चांगलेच फैलावू लागले. निरक्षर असूनही हिंदु स्त्रियांना हिंदु संस्कृतीचे जे संरक्षण केले आहे त्याचे बरेचसे श्रेय पुराण श्रवण, पौराणिक धर्मपालन, व मध्य युगातील संत कवींच्या लोकभाषेतील वचनांचे पठण यासच दिले पाहिजे.

राजघराण्यातील स्त्रियांना राज्यकारभाराचे व लष्करी कवायतीचे शिक्षण देण्यात येई. अलेक्झांडर स्वारीच्या वेळी आपला पती बळी पडला असता राणीने राजधानीच्या बचावाचे व राज्यकारभाराचे काम आपल्याकडे घेतले होते. सातवाहन घराण्यातील राणी व वाकाटक घराण्यातील प्रभावतीगुप्ता राणी या दोघीही आपल्या पतीच्या पश्चात मुलांच्या अज्ञानावस्थेत आपल्या राज्याचा कारभार पाहत होत्या. चालुक्य राजवटीत राजघराण्यातील पुष्कळ गोष्टी स्त्रियाकडे राज्यकारभारातील जबाबदारीची कामे सोपविण्यात आली होती. सातव्या शतकात अनेक स्त्रियांकडे शहराधिकाऱ्याचे, प्रांताधिकाऱ्याचे काम सोपविण्यात आल्याचा उल्लेख आहे. यावरून त्या राजस्त्रियांना राज्यकारभाराचे शिक्षण दिले जात असे हेच सिद्ध होते. घोड्यावर बसणे, तलवार, भाला आदि हत्यारे चालविणे, पोहणे वगैरे गोष्टी त्याना येत असत.

ललित कला व वाङमय हेच सामान्यपणे सर्व साधारण स्त्रियांच्या शिक्षणाचे मुख्य विषय असत. शिक्षणाने स्त्रिया आर्थिक दृष्टचा स्वावलंबी व्हाव्यात, ही कल्पना अलीकडची आहे. ती प्राचीन हिंदुस्थानात नव्हती. तथापि कठीण काळ ओढवला तर हिंदू विधवांची स्थिती पूर्वकाळी असहाय होत नसे. सूत कताई विणकाम या कला त्याना अवगत असत. आपत्काली याचा उपयोग त्याना होत असे.

मोगल सत्ता संपुष्टात आली. मराठेशाही अस्तंगत झाली. हिंदुस्थानवर इंग्रजी अंमल १९ व्या शतकात सुरू झाला. त्यांच दृष्टिकोन उदार होता. त्यांच्या अमदानीत अनेक सुधारणा होत गेल्या. शैक्षणिक सुविधा पुष्कळ झाल्या. या सर्वांचा तरुण पिढीवर परिणाम होऊ लागला. राजाराम मोहन रॉय. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, दयानंद सरस्वती, लजपतराय, लोकहितवादी, बाळ शास्त्री जांभेकर, महादेव गोविंद रानडे, आगरकर, ज्योतीबा फुले, धोंडो केशव कर्वे आदि सुधारक निर्माण झाले. त्यानी हिंदु समाजातील बाल विवाह, विधवा विवाह निषेध व तत्सम अनेक रूढींचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला. सतीची चाल बंद पाडली. बंगालात ब्राह्मो समाज, पंजाब येथे आर्य समाज, ख्रिश्चन मिशनरी तसेच महात्मा फुले, महर्षी कर्वे आदि मंडळीनी स्त्रियांनी शैक्षणिक क्षेत्रात पाऊल पुढे टाकण्यासाठी अथक परिश्रम केले. यांच्या प्रयत्नांमुळेच स्त्रियांना शैक्षणिक संधी प्राप्त झाली. शिक्षणानंतर कित्येक स्त्रिया स्वतंत्रपणे अर्थार्जन करू लागल्या. बाल विवाह बंद झाले. विधवांना पुनर्विवाहाची संधी प्राप्त झाली. अशा प्रकारे स्त्री मोकळ्या मनाने वावरू लागली. स्वातंत्र्य संग्रामात स्त्रियांचा मोठा सहभाग होता. स्त्रिया या अशा प्रकारे पुन: धीट झाल्या.

मध्यंतरीच्या काळात स्त्री शिक्षणाची आबाळ झाली. ती निरक्षर राहिली. लग्न व मुले याच गोष्टी तिच्या वाटेला आल्या. ती संसारातच जखडली गेली. तिचे स्वतंत्र अस्तित्वच नष्ट झाले हा मनु पालटला व स्त्री पुन: आपल्या सर्व नैपुण्यानिशी जगात वावरू लागली. कालौघात अनेक चढ उतार झाले. वरवर पाहता स्त्रीचा दर्जा खालावला असे दिसत होते. परंतु तिच्याबद्दल एक उदार दृष्टिकोन असलेलाही आढळतो. तिच्या शिक्षणाची आबाळ झाली, त्याची कारणेही वरील विवेचनावरून स्पष्ट झाल्याने कालौघात या घडलेल्या गोष्टी म्हणूनच पाहिले गेले पाहिजे. आपल्या संस्कृतीने निर्माण झालेला उदार दृष्टिकोन याही काळात जपण्याचा कसोशीने प्रयत्न झाला हे दृष्टीआड करता येणार नाही. घरात स्त्रीची सत्ता चालत असे. घर धणीन हाच मान तिला प्राप्त झाला होता. समाजात तिला प्रतिष्ठा होती. तिच्या स्त्रीधनाचा हक्क मान्य होता. घरातील साऱ्याच आर्थिक व्यवहारात ती लक्ष घाली. तिचे हे स्वातंत्र्य अबाधित राहिले आहे. ह्या सांस्कृतिक मूल्यांची जपणूक केली गेली आहे. शाश्वत विचार कालौघात नष्ट होत नाहीत हेच खरे.

शिक्षणरहित काळातही भारतीय स्त्री सुसंस्कृतच होती. पुराण श्रवणाच्या माध्यमातून तिला आपल्या प्राचीन संस्कृतीचा परिचय होत असे. तिची धार्मिक प्रवृत्ती कधीच म्लान झाली नाही. मुलांच्यावर योग्य संस्कार ती करत असे. मुलांना योग्य वळण लावीत असे. तिला अनेक कलाही अवगत असत. ती उत्कृष्ट मूर्ती बनवत असे. शिवण, कशिदा काढणे, उत्कृष्ट रांगोळी काढणे, उटणे तयार करणे, विविध प्रकारची पक्वान्न तयार करणे, विविध प्रकारची तोरणे तयार करणे, विशेष प्रकरची सजावट आदि मध्यम वर्गातल्या स्त्रीला अवगत होत्या. तसेच खेड्डुत व इतर धंदा करणाऱ्या स्त्रीला कृषि विज्ञान, चामडी कमावणे, रंग तयार करणे आदि त्यांच्या कामातली माहिती दारातच पुरुषांकडून मिळत असे व त्यात त्या निष्णात पण असत. काही स्त्रियाना मंत्रतंत्रांदि उपचार पद्धती माहीत असे, काहींना अनेक वनस्पती व त्यांचे रोगनिवारण्यासाठी उपयोग माहीत असत. सांप्रत काळच्या साक्षर स्त्रियाना ज्या गोष्टींचे ज्ञान असत नाही त्या, ज्यांना आपण निरक्षर म्हणतो, त्यांना माहीत होत्या.

अध्यात्मिक विचार कधीच जुनाट होत नाही वा कधी म्लान होत नाही वा नष्टही होत नाही. भारतातील स्त्रीला या विचाराचे बालपणापासून बाळकडूच प्राप्त झाले आहे. त्यामुळे तिच्यातील अंत:प्रकाश तिला मार्गदर्शक होत असतो. आपली प्रतिष्ठा, पावित्र्य व चारित्र्य ती सतत जागरूकतेने जपत असते. तिच्या ठिकाणी असणारी सहिष्णुतावृत्ती, असणारा मार्दव, कष्ट झेलण्याची मानसिक तयारी, स्वभावतील गोडवा आदी गोष्टी तिच्यात मुरलेल्या आध्यात्मिक विचारांचीच साक्ष देतात.

खरे शिक्षण म्हणजे सर्व मानसिक शक्तीचा विकास करणे होय. शिक्षणाने व्यक्तीला काही वळण लावता येते यामुळे ती आपली इच्छा शक्ती चांगल्या गोष्टीकडे वळवू शकेल. थोर निर्भय स्त्रियांची जी वाण आहे ती अशा शिक्षणाने दूर होईल व सर्वश्रेष्ठ स्त्रियांची परंपरा पुढे चालेल. भगवंताच्या चरणस्पर्शाने प्राप्त होणारे सामर्थ्य त्यांच्या हृदयात विराजमान आहे. त्या पवित्र आणि नि:स्वार्थी आहेत. सर्वसाधारण कर्मे श्रद्धेने व कर्तव्य बुद्धीने पार पाडणे यांनीही ज्ञान प्राप्त होते. (श्रध्दावान् लभते ज्ञानम्)

भारतात माता ही कुटुंबाचे केन्द्र स्थानी असते. आणि तीच आमचा सर्वोच्च आदर्श. ईश्वर एकच आहे हे सत्य ऋषीने शोधून काढले (एकंसत् विप्रबहुधावदन्ति।) आमचा ईश्वर सगण व निर्गुण आहे. निर्गुण ईश्वर पुरुष तर सगुण ईश्वर स्त्री. ईश्वराचा प्रथम सगुण आविष्कार म्हणजे माता होय. सर्वां आधी तिला आधी वंदन केले जाते 'मातृदेवोभव।' ही आमच्या उपनिषदांची शिकवण आहे. आमच्या माता शुद्ध आणि पवित्र असल्याने आमच्यावर तिच्याकडून योग्य संस्कार होत आहेत. पावित्र्य हाच आमच्या समाजाचा मुख्य

आधार आहे.

**सांप्रतचे शिक्षण व स्त्रीची घडण :**

आज शिक्षण क्षेत्रात स्त्रिया मोकळ्या मनाने संचार करीत आहेत. आज शिक्षण सार्वजनिक झाले आहे. सर्व प्रकारचे भौतिक शिक्षण घेऊन आजची स्त्री डॉक्टर, वकील, इंजिनिअर, अर्थव्यवस्थापिका, पोलीस अधीक्षक, विमान चालक इत्यादी ठिकाणी कार्य करीत आहे. या सर्व क्षेत्रांत अर्थार्जनही बऱ्यापैकी करत आहे. पुरुषाच्या बरोबरीने किंबहुना प्रतिस्पर्धक या नात्याने ती काम करीत आहे. शहरी जीवनाशी निगडित असलेल्या काही स्त्रियांना धाडसी जीवन जगणे, रुपेरी पडद्यावर चमकणे, खूप अर्थार्जन करणे व स्वतंत्रवृत्तीने जीवन कंठणे हे बव्हंशी आवडू लागले आहे. या भूमिकेतून त्यांची प्रतिमा साकारत आहे. स्त्री औद्योगिक क्षेत्रात वावरते तशी साहित्य क्षेत्रातही तिने आपला ठसा उमटविला आहे. अनेक स्त्रिया साहित्य क्षेत्रात प्रथित यश लेखिका झाल्या आहेत व होत आहेत. तसेच काही स्त्रिया थोर कवयित्री म्हणून प्रसिद्ध पावल्या आहेत. आजची स्त्री वेदकाळाइतकीच सुबुद्ध व स्वतंत्र झाली आहे. ती आपल्या प्रतिभेचे विलक्षण दर्शन घडवीत आहे. या साऱ्या गोष्टी पाहून मन आश्चर्यचकित होते. स्त्री ही खरोखरच महान शक्ती आहे. याचा प्रत्यय आजच्या स्त्रीतही येतो. या शक्तीला विनम्रपणे अभिवादन करून प्रार्थना करावीशी वाटते.

या देवि सर्वभूतेषु शक्ति रूपेण संस्थिता!
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमोनम:।

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

**९ चे महत्त्व**

**नाथपंथांची नऊ वैशिष्ट्ये :**
मेखला, शृंगी, पुंगी, कंथा, कर्णमुद्रा, कौपीन, व्याघ्रांबर, खडावा, झोळी.

**सेवनाने वाढणाऱ्या नऊ गोष्टी :**
उद्योग, कलह, कण्डू, द्यूत, मद्य, मैथुन, आहार, व्यसन, निद्रा.

**नव ग्रहांची नव धान्ये :**
रवी-गहू, चंद्र-डांगेर, मंगळ-तूर, बुध-जव, गुरू-चणे, शुक्र-मूग, शनी-तीळ, राहू-उडीद, केतू-कांग (ज्योतिष)

**नव ग्रहांची नऊ रत्ने :**
सूर्य-मणिक, चंद्र-मोती, मंगळ-प्रवाळ, बुध-पाचू, गुरू-पुष्पराग, शुक्र-हिरा, शनी-नीळ, राहू-गोमेद, केतू-वैडूर्य मणी

**नव द्वारे :**
२ डोळे, २ कान, २ नाकपुड्या, १ तोंड, १ गुदद्वार आणि १ मूत्रद्वार

**नऊ आचार्य रसेश्वर मताचे :**
आदिनाथ, गोरख, भालुकी, काकचंडीश्वर, मंथान भैरव, नित्यनाथ, चर्पटी, (पूज्यपाद) गोविंदाचार्य, कपाली

**नऊ मतवाद :**
पुत्र हाच आत्मा, देह हाच आत्मा, इंद्रिये हाच आत्मा, प्राणच आत्मा, मनच आत्मा, बुद्धी हाच आत्मा, अज्ञान हाच आत्मा, ज्ञान आणि अज्ञान मिळून आत्मा, शून्य हेच आत्मा

**ब्रह्मदेवाचे नऊ मानसपुत्र :**
भृगू, पुलस्त्य, पुलह, ऋतू, अंगिरा, दक्ष, अत्री, मरीची, वसिष्ठ

●●●

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*भारतीय संस्कृतीचे अलौकिक व दिव्य वैशिष्ट्य जपणे का आवश्यक आहे ह्यावरचे हे विचार - संपादक*

डॉ. निहार रंजन राय म्हणतात की असे दिसते की संस्कृतिच्या रूपामध्ये रवीन्द्रनाथ टागोर कुठल्या गोष्टी सामावतात असे मानतात - तर समस्त, 'काव्य साहित्य, शिल्पकला (जड), धर्म - कर्म (Religious Acts), शिक्षा दीक्षा, ज्ञान - विज्ञान, दर्शन - मननचे परिणाम, सामाजिक भव्यता व शालीनता, रूचिमधील सूक्ष्मता आणि कोमलता इत्यादि.' ज्या विद्वानींनी पाश्चात्य संस्कृतीमधील इंग्रजी शिक्षणांतून संस्कृती (culture) याचा परिचय करून घेतला. त्यांच्या समजामध्ये संस्कृतीमध्ये वरील गोष्टींचाच अंतर्भाव गृहीत धरला जातो. आहार - विहार, वेशभूषा, बातचीत, चाल-ढाल वगैरे मध्ये जी ह्या संस्कृतीवर आधारभूत संकल्पना दिसते त्यालाही ही 'सुसंस्कृत' बुद्धीजीवी विव्दान मंडळी आपली मान्यता देतात.

इथे, मला स्वाभाविकपणे सध्याच्या भारतातील संस्कृती संघर्षामध्ये जी उदाहरणे डोळ्यासमोर येतात ती म्हणजे Pub-culture, Drug - Addiction, Bar - girls etc. काही दूषित भारतीय रीतीरिवाज, धार्मिक कार्यक्रम ही सुद्धा म्हणता येतील. ह्या संघर्षामध्ये जी मतभिन्नता आहे, तिचे **खरे कारण किंवा स्वरूप ह्या रविंद्रनाथ व डॉ. निहार रंजन राय यांच्या वादात गवसेल** असे मला वाटते. रविन्द्रनाथ टागोर ह्यांची सांस्कृतिक दृष्टि अर्थातच उंच व श्रेष्ठ आहे. एव्हढेंच नव्हे तर त्यांच्या काव्यात, चित्रकलेत व शिक्षण क्रमामध्ये पुष्कळ अंशी वेदीक संस्कृतिला स्पर्श करील अशा अनेक संकल्पना जरूर दिसतात, आणि त्याचे कारणही उघड आहे. रविन्द्रनाथ टागोर यांना वेद व उपनिषद यांचा परिचय त्यांच्या विशेष शिक्षकांनी विशेष आस्थेने दिलेला होता.

पण, मग तरीही **'कृष्टि'** कल्पनेच्या संदर्भात कुठल्या गोष्टीवरचा भर कमी दिसला? (डॉ. निहाररंजन राय यांनी), **हे पहाण्याची मला आत्यांतिक उत्सूकता वाटली** व ती पहाणे आपणा सर्वात मोठे उद्‌बोधक व मूलगामी दृष्टिकडे लक्ष वेधू शकेल, असा मला विश्वास वाटतो.

बंगालमध्ये **बंकिमचंद्र चटर्जी** ह्यांनी संस्कृतीच्या संकल्पनेत 'अनूशीलन अर्थ' असण्याचा आग्रह धरला. त्यामुळे अशा तऱ्हेची एक चळवळ राष्ट्रीय परंपरेशी सुसंगत अशी '**अनुशीलन समिती**' सुद्धा स्थापन झाली होती.

परंतू डॉ. निहार रंजन राय ह्याही पुढे जाऊन सांगताहेत की **भारतीय परंपरेत 'शील' ही संकल्पना** फार महत्वाची मनाली गेली आहे. कुल - शील ह्या दोन शब्दात आपण जे स्वरूप भारतीय संस्कृतीमध्ये पहातो त्याचा खरा अर्थ समजणे आवश्यक आहे.

**'' 'कुल' स्थिर पदार्थ है। इसलिए कुल अतीत है: 'उत्तराधिकार', गतिहीन, निष्क्रिय है, इसलिए उसके भीतर जीवन सक्रिय नही। किन्तु शील कभी भी स्थिर रूप में नही रहता।''**

### शील संवर्धन सामाजिक जबाबदारी :

त्यामुळे शील संवर्धन प्रत्येक काळात करण्याची जबाबदारी समाजावर पडते. शीलाच्या ऱ्हासाने संस्कृतीचा ऱ्हास होतो.

ज्याप्रमाणे कृषि भूमी ही दरवर्षी वर्षाऋतुच्या आगमना अगोदर शुद्ध व तिची नांगरून मशागत करावी लागते तशी

संस्कार क्रिया शील स्थापन व संगोपन, संवर्धन ह्यासाठी करावी लागते. ही समाजाची सुसंस्कृतता संभाळण्याची क्रिया होय. (डॉ. इरावती कर्वे म्हणतात परशुरामाचे ब्राह्मण वंशज हे कोकणातील शेतकरी ह्या रूपात, शेतावर राब करून मग पीक काढतात, म्हणून ते 'चित्तपावन किंवा चितीपावन' आहेत.)

**त्यामुळे राय लिहीतात 'कल्चर का निर्माण करना पडता है।'**

आपण आता पर्यंतच्या विवेचनात संस्कृती ही जरी वरकरणी मानवी समाज निर्मीत अशी दिसली तरी ही 'संस्कृती' ज्या काही विशिष्ट काळात बघितली जाते, तिला ह्या संस्कृतीच्या इतिहासाचा संदर्भ, ज्या भूभागावर व ज्या समाजाने त्या संस्कृतीचा संभाळ व संवर्धन केले, त्याचा संदर्भ लावावयाला लागतो. तसेच, ही संस्कृती निर्माण होण्याचे काही शास्त्र आहे. ह्या शास्त्राचा मागमूस घेण्याचे जे प्रयत्न झालेले दिसतात ते अपूर्ण व केवळ भौतिक, सामाजिक स्तरावर झालेले आढळतात. ह्या संस्कृतीची धारणा ज्या समाजात दिसते त्या समाजातील मानवी फॉर्मचा विशेष अभ्यास केलेला आढळत नाही. एव्हढेंच, नव्हे तर त्या संस्कृतीच्या वैशिष्टयांचा, निर्मीतीचा, गुण - अवगुणांचा अभ्यास अगदी वरवरचा झालेला आढळतो.

सर्वात, महत्वाचा मुद्दा म्हणजे जर ह्या पृथ्वीवरील मानव व मानवी समाज जर ह्या संस्कृतीच्या रूपाला व अभिव्यक्तीला जबाबदार असेल तर त्याच्या श्रद्धा, जीवनमूल्ये, जीवन हेतू व जीवन व्यवहार आणि त्या व्यवहाराला पोषक अशी विशिष्ट समाज रचना (Social, Political, Economical, Philosophical Structures) कोणती ह्याचा खोलवर विचार केलेला आढळत नाही. संस्कृतीच्या बहीरंगाच्या रूपाची चविष्ट भरघोस वर्णने ह्यांतच विचारवंत गढलेले दिसतात.

संस्कृतीच्या निर्मीतीचे, मूल्यांचे प्रेरक शक्तीस्त्रोत कोणते, त्यांची क्रिया (operation) कशी होते. ह्या प्रवाहाची दिशा कोणती व त्याची ध्येयधारणा कोणती हा विचार आढळत नाही.

मग, काय भौतिक विज्ञानाच्या सध्याच्या धारणेतील Statistical Probability किंवा Principle of uncertainty म्हणजे आकड्यांच्या गणिती जुगारावर किंवा अनिश्चिततेच्या 'तत्वावर' व बेताल व्यवहारावर संस्कृती वाटचाल करते, असे मानावयाचे काय?

याच्या उलट ज्या वेदज्ञानाची विस्मृती आजच्या समाजाला झाली आहे, त्यातील कर्मकांडातील एका छोट्याशा व पूर्ण विस्मृतीत व 'Ignorant Reverence' म्हणजे 'अज्ञानी आदर' ह्या भावांत असलेल्या, हिंदू समाजाने जतन केलेल्या 'ऐतरेय ब्राह्मण' ह्या अध्यासात हे शास्त्र सापडावे? ह्या प्रश्नाचा विचार आपण पुढच्या अंकात करू या.

॥ कृष्णार्पणमस्तू ॥

**परिशिष्ट :**

(भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना विद्या प्रसारक मंडळाच्या 'दिशा' मासिकाच्या फेब्रुवारी २००९ चा अंक)

ह्या लेखातील '**देवशिल्प व मानुषशिल्प**' ह्याबद्दल थोडे जास्त स्पष्टीकरण काही शिल्पचित्रांनी होईल, असे वाटल्यावरून खालील चित्रे केवळ उदाहरणादाखल छापली आहेत.



चित्र नं. १ अजंठा, चैत्य हॉल

'आधी कळस मग पाया' किंवा 'उर्ध्वमूल अध:ग्तख - भ गीता अभंग. ह्या तत्वाचे दगडातील भाष्य.



चित्र नं. २ शिल्पांची 'संध्या भाषा', **Erotic Sculptures,**

* ''Washer Woman Clings to the Yogi'' (धोबी स्त्री-कन्या योग्याच्या गळ्याला बिलगून अलिंगन देते''


* (डोंबी = कुंडलिनी शक्ति) ही उर्ध्वगतीने स्वाधिष्ठान चक्रपाशी येते.



चित्र नं. ३ 'सुंदर स्त्री नग्न विवस्त्र होताना'.

स्त्री नग्नता ही प्रजजन क्रियेला आवश्यक अशी द्योतक एक आकर्णपा चिन्ह होय ही भावचित्रणा.

संस्कृत खर्जरा = सापाचे नाव, म्हणून स्वजू राहो, सापाशी संलग्न, नग्न स्त्री कल्पना मोहवती.



चित्र नं. ४ ''**ggnude**'' मायकेल अँजेलो, Male Body indicating Strength and Male Beauty. पुरुष देहाचे सौंदर्य प्राणयुक्त असल्याचा जबर आभास.



चित्र नं. ५ Birth - प्रजनन

ज्या मानवी क्रियेने 'प्रजनन' होते त्याबद्दल चिंतनाला प्रवृत्त करणारे शिल्प. संस्कृतीच्या कालातील सातत्याचा भौतिक स्तरावरील आधार.



चित्र नं. ६ इटालियन, शिल्पकृतीचा श्रेष्ठ कलाकार मायकेल अँजेलो

चैतन्य व जड मधील भेदावरील सूक्ष्म स्तरावर विश्लेषण होणाऱ्या शिल्प सौंदर्याचा रचणारा कलाकार



चित्र नं. ७ ओरिसा डान्सर

प्रत्यक्ष भारतीय ओडिसी स्त्री नृत्यांगिनी हे एक 'देवशिल्प' मानवी देहधारीच होय.



चित्र नं. ८ बहाई देऊळ

भावसाधनेचा धर्म अविष्कार कमळाच्या मुलायम पाकळ्यांच्या रूपात संगमरवरी वास्तुशिल्प

**यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी, अग्यारी लेन,

ठाणे. दूरध्वनी - २५३६८४५०

E mail;: yrsane@eth.net


●●●

# वाचन व्यवस्थापन

*वाचन ही घाईने उरकण्याची बाब नाही. दिशांकित वाचनाचा आपल्या जडणघडणीत मोठा वाटा असतो. त्या दृष्टीने हे संक्षिप्त विचार - संपादक*

**प्रास्ताविक :**

जगात ज्ञानाचा विस्फोट झाला आहे. त्यातून निरनिराळ्या विषयांवरील अनेकविध माध्यमांतील वाचनसाहित्य वाचकांच्या पुढे दररोज उभे ठाकत आहे. ते सर्वच सर्वांच्या उपयोगाचे असते, असे नाही. आपल्या उपयोगाचे, अभ्यास विषयाचे साहित्य वेळेवर व निरंतर उपलब्ध व्हावे, यासाठी वाचन व्यवस्थापनाची गरज भासते.




**(आकृती क्र. १ : ज्ञान प्राप्तीच्या पद्धती)**

एखाद्या विषयातील ज्ञानप्राप्तीच्या एकूण तीन पद्धती आहेत. (आकृती क्र. १ पहा)

**१) ऐकून :** या पद्धतीत दुसरा कुणीतरी त्याच्या अनुभवांवर आधारित माहिती आपल्याला देतो. यात बोलणारा व ऐकणारा असे दोन घटक कार्यरत असतात. ती ऐकून ऐकणाऱ्याला विशिष्ट गोष्टीबाबतचे ज्ञान प्राप्त होते. उदा. एखादे नाटक पाहून ते चांगले किंवा वाईट असल्याबाबतच मत एखादा आपल्याला ऐकवतो. त्यावरून आपलेही मत तसेच बनते.

**२) अनुभवून :** या पद्धतीत आपण स्वत: एखाद्या गोष्टीचा अनुभव घेतो व तो अनुभवून आपण ज्ञानप्राप्ती करून घेतो. इथे 'स्वत:' हा एकच घटक कार्यरत असतो. उदा. अंगात ताप आहे की नाही हे आपण हात लावून अनुभवतो.

**३) वाचून :** या पद्धतीत आपण लिहिलेली किंवा छापलेली माहिती वाचून ज्ञानप्राप्ती करून घेतो. यात लिहिणारा व वाचणारा असे दोन घटक कार्यरत असतात. उदा. एखाद्या देशाबद्दलची माहिती तिथे प्रत्यक्ष न जाताही प्रवासवर्णन वाचून आपल्याला प्राप्त करून घेता येते.

**वाचन - एक गरज :**

आजच्या माहितीच्या युगात 'वाचन' ही एक गरज बनलेली आहे. माहिती प्राप्त करण्याची ही एक सरळ, साधी व तुलनेने स्वस्त अशी पद्धती आहे. वाचनाची ही गरज आपल्याला प्रामुख्याने खालील कारणांसाठी उपयुक्त ठरते. वाचनामुळे -

१) ज्ञानात भर पडते. २) बहुश्रुतता निर्माण होते.
३) बौद्धिक विकास होतो. ४) आत्मविश्वास वाढतो.
५) मानसिक ताण कमी होतो.


**व्यवस्थापन :**

सुसंगत क्रमरचना म्हणजे व्यवस्थापन. व्यवस्थापनामुळे कार्य जलद होते. नेटकेपणा व अचूकता वाढते. वेळेची व श्रमांची बचत होते. कपाटात कशातरी कोंबलेल्या पुस्तकांतून हवे ते पुस्तक चटकन सापडत नाही. मात्र तीच पुस्तके व्यवस्थित विषयवार लावून ठेवली तर क्षणात हवे ते पुस्तक आपण शोधून प्राप्त करू शकतो. यालाच व्यवस्थापन असे आपण म्हणतो.

साधु स्वरूप निर्विकार। तेथें कैचा तिरस्कार॥

**वाचन व्यवस्थापन :**

ही एक नवी संकल्पना आहे. आपल्या वाचनाचं व्यवस्थापन करण्याची प्रक्रिया त्यात अंतर्भूत आहे. आपण विविध कारणांसाठी वाचन करीत असतो. वाचन व्यवस्थापन न केल्यास नको त्या माहितीची अडगळ जमा होऊ शकते. वेळ फुकट जातो. नव्या व अद्ययावत माहितीपासून आपण वंचित राहतो. हे टाळण्यासाठी वाचन व्यवस्थापन करावे लागते.




वाचनाचं व्यवस्थापन हे साधारणत: तीन टप्प्यांत केले जाते. (आकृती क्र. २ पहा)

**१) पायाभूत वाचन :** या टप्प्यात आपले व्यावसायिक काम, अभ्यास अथवा संशोधनाचा विषय यांच्याशी निगडित वाचन केले जाते. हे वाचन आपल्या व्यक्तित्वाचा हिस्सा असते. एकंदर वाचनापैकी याचे प्रमाण ६० टक्के इतके असते. विशिष्ट विषयातील परिपूर्णता हे वाचन आपल्याला मिळवून देते. समजा, एखादा वाचक जर विद्यार्थी असेल तर आपल्या विषयाची पाठ्य व पाठ्येतर पुस्तके त्याने वाचावीत. हे वाचन त्याचा पाया मजबूत करते. म्हणूनच, याला पायाभूत वाचन म्हणतात.

**२) प्रचलित वाचन :** दैनंदिन जीवनात नित्य नवी माहिती उपलब्ध होत असते. ही माहिती पायाभूत वाचनास पूरक असते. त्यामुळे विशिष्ट विषयातील ज्ञान अद्ययावत होत राहते. म्हणून या वाचनास प्रचलित वाचन असे म्हणतात. आपल्या व्यावसायिक कामाच्या दृष्टीने हे वाचन गरजेचे असते. याचे प्रमाण ३० टक्के इतके असते.

**३) करमणूकप्रधान वाचन :** या टप्प्यातील वाचन हे वाचनाचा आनंद मिळवून देते. इतरांचे अनुभव, कल्पना, विचारसौंदर्य यांच्या आस्वादाने नवा उत्साह व जोम प्राप्त होतो. हे वाचन १० टक्के इतके असावे. वाचनोपचार (Reading Therapy) ही एक नवी उपचार पद्धती म्हणूनच सध्या विकसित होत आहे.

**सारांश :**

घाईघाईने, कसेतरी निवड न करता वाचलेले साहित्य हे बकाबक घास गिळून घेतलेल्या जेवणासारखे असते. त्याने शरीराला फायदा न होता, अपचनच होते. सुसंगत, योग्य प्रमाणात व आवश्यकतेप्रमाणे क्रमवारी लावून वाचन केल्यास ते बौद्धिक, तसेच मानसिक समाधान मिळवून देते. वाचन व्यवस्थापनाचा हाच तर खरा फायदा आहे.

**प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये**
ग्रंथपाल,
स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय,
आयरे मार्ग, दत्तनगर,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१,
भ्रमणध्वनी- ९२२४७३४०३८

●●●

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

# जेष्ठाने आपली कुटुंब व्यवस्था कशी सांभाळावी

*ज्येष्ठ व्यक्तींचे कुटुंबातील स्थान हा एक महत्त्वाचा विषय या स्फुट लेखात आहे - संपादक*

कविवर्य मंगेश पाडगावकर म्हणतात तेच खरे आहे. ते म्हणतात,

‘‘सांगा कसं जगायचं कण्हत, कण्हत की
गाण म्हणत म्हणत’’
रडत रडत जगायच की
हसत हसत मरायचं
हे आपलं आपणच ठरवायचं,
सांगा कसं जगायचं.

आपण कसे जगायचे हे सर्वस्वी आपल्या प्रत्येकावरच अवलंबून आहे जीवनाकडे आपण काय व कसे म्हणून पाहातो यावर सर्व अवलंबून आहे.

ज्येष्ठ नागरिकांना आनंदी उत्साही ठेवणे हे आवश्यक आहे. तरच त्यांची प्रकृत्ती चांगली आरोग्यदायी राहू शकते, आणि ही जबाबदारी कुटुंबाची, नातेवाईकांची व सहकाऱ्यांची असते. परंतु त्यांनी तसे राहणे सहकार्य करणे ही जबाबदारी त्यांची स्वत:ची, ज्येष्ठांची आहे.

पूर्वी एकत्र कुटुंबात ज्येष्ठ नागरिक सहज सामावून जात असे, आता अनेक कारणांमुळे कुटुंबपद्धतीचे विघटन झालेले आहे. कुटुंबाची व्याख्याही बदलली आहे. ‘मी, माझी पत्नी एक किंवा फार तर दोन मुलं’ एवढसं कुटुंब आहे. त्यामुळे कुटुंब व कुटुंबाबाहेरील कुटुंबाचे प्रश्न फार गुंतागुंतीचे बनत चालले आहेत हा गुंता सोडविण्यासाठी ज्येष्ठांनीच पुढाकार घ्यायचा आहे.

जेष्ठांनी स्वत:चे जीवन व आपल्या कुटुंबाचे जीवन सुखी, समाधानी आनंदी, प्रसन्न उव्हांसित चिंतारहित कसे राहील ह्याची काळजी घ्यावी व आपल्या अनुभवाचा कुटुंबाला, समाजाला फायदा करून द्यावा, आपण कोणावर भार न ठरता सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे, आवश्यक तेथे सहाय्य करणे, आपल्या आयुष्यांच्या ह्या टप्प्यांवर मनाशी एक गाठ पक्की बांधावी की ही वेळ घेण्याची नाही, मागण्याची नाही तर ही वेळ फक्त देण्याची आहे आपल्याकडे असलेल्यांतून आपण भरभरून दिले पाहिजे. घेण्यापेक्षा देण्यात आनंद, समाधान जास्त असतं.

आपल्याकडे सेवानिवृत्त झालेल्या जेष्ठांकडे बघण्याचा त्याच्या कुटुंबाचा दृष्टिकोन जरा बदलतो. कमावती कुटुंब प्रमुख व्यक्ती कुटुंबात अतिमहत्त्वाची असते, परंतु आता ती व्यक्ती कमावत नाही, उत्पन्न कमी झाले आहे, म्हणून महत्वही कमी झालेले दिसून येते. काही ज्येष्ठ माझं जे म्हणण आहे तेच खरे आणि तसेच झाले पाहिजे अशी भूमिका घेतात. आमच्या वेळी अस नव्हतं वगैरे पालुपद चालवतात. खालावलेल्या परिस्थितीची जरा सुद्धा जाणीव ठेवत नाही. सुंभ जळला तरी पीळ तसाच कायम राहतो. त्यामुळे स्वत:वर व कुटुंबावर अनेक संकटे ओढवून घेतात. साहजिकच, अशांना वृद्धाश्रमात किंवा पर्यायी सोय करावी लागते. तेव्हा दोष कुणाचा? हा प्रश्न महत्त्वाचा नाही तर वाद ना करता सर्वच कुटुंबानी, पिढ्यांनी एकमेकांशी जुळते घेतले तर संपूर्ण कुटुंबाचे जीवन सुखकर होऊ शकते. कुटुंबाला जेष्ठाच्या अनुभवाचा आस्थापूर्ण प्रेमाचा, ज्ञानाचा फायदा मिळू शकतो तर जेष्ठांना प्रेमाची उब, आदर, समाधान मिळू शकते. परंतु ही गोष्ट अनेकांच्या ध्यानातच येत नाही. आणि काहीना कळतं पण वळत नाही.

उत्तम गुण अंगी असणे, हे भाग्यवंताचे लक्षण आहे.

सध्या एका गोष्टीची फार उणीव भासते ते म्हणजे जेष्ठांना सन्मानाने, प्रेमाने, आदराने वागवणे. ही उणीव भरून काढण्यासाठी जेष्ठानेच एक पाऊल पुढे टाकून क्रियाशील राहिले पाहिजे. क्रियाशील वृद्धत्वं फरक घडवून आणतं, म्हणूनच आपण आपल्या मनाशी ठरवू या की आपल्या वेळच्या व आताच्या वातावरणांत खूप फरक पडला आहे. माणसा - माणसांत बदल होत आहेत. नव्या पिढीच्या गरजा, आवडी - निवडी बदलत चालल्या आहेत. अशा वेळी जुने ते सोने असं म्हणत व नवं ते हवं असं म्हणत स्वागत करू या. नव्या पिढीला समजून घेणे आवश्यक आहे. कुटुंबाच्या आनंदात सहभागी होऊन तो द्विगुणीत करणे हीच खरी काळाची गरज आहे.

जेष्ठांनी आपल्या कुटुंबाला वेळ द्यावा. कुटुंबासमवेत नाटक, सिनेमा, प्रेक्षणीय स्थळे बघावीत. मुलाच लग्न जमवण्यात स्वत: पुढाकार घ्यावा. मुलांना स्वतंत्र संसार थाटून दिला पाहिजे. शक्य असल्यास आर्थिक साह्य करावे, कुरकुर करू नये, अडल्या नडल्यास मदत करावी. कुटुंबाला हवे ते स्वातंत्र्य द्यावे. एकत्र राहण्याची वेळ आल्यास मुलांच्या संसारात आपली लुडबूड नको, सुनेकडच्या मंडळीचा पाणउतारा होईल, त्यांना दूषणे लागतील असे काही बोलू नये. स्वत:ची काम स्वत: करावी. कुटुंबाला अनावश्यक सल्ले व प्रतिक्रिया देऊ नयेत.

जेष्ठांच्या आयुष्यात एक लोभसवाणे आणि अनोखे विश्व उतरते ते म्हणजे इटुकल्या पिटुकल्या नातवंडाचे. नव्या आशा आणि आकांशा, आनंदाच्या डोही तरंगत राहवे असे हे विश्व आहे. आपला वंश वाढावा, फुलावा, बहरावा असे प्रत्येकाला वाटत असते. वयाच्या ६५ व्या ७० व्या वर्षी पुन्हा आपले बालपण आपण अनुभवत असतो. आई - बाबा पेक्षा आजी - आजोबांकडे नातवंड जास्त झेपावत असतात. त्यांना शिकवणे, वाचून दाखवणे वगैरे केल्यास आपले म्हातारपण कुठे पळून जाते तेच कळत नाही आणि हीच खरी गंमत आहे. आपल्या नातवंडांकडून कसलीच अपेक्षा नसते. नातवंडांची सर्व जबाबदारी ही त्याच्या आई - बाबांची असते. तेव्हा नातवंडाबाबतचे सर्व निर्णय त्याचे तेच घेणार; एवढी समज जरूर ठेवावी.

जेष्ठाने आपली कुटुंब व्यवस्था सांभाळताना काही पथ्ये पाळली पाहिजेत. तर काही गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत - मुलाचा सुनेचा आग्रहच असेल तर त्यांच्याबरोबर रहावे. परंतु जबाबदारी मुलांवर सुनेवर सोपवावी त्यांच्या संसारात आपली लुडबूड नसावी. शक्य तो त्यांना स्वतंत्र संसार थाटून द्यावा व येऊन - जाऊन प्रेमाने रहावे. त्यांच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन द्यावे.

जेष्ठांनी आपले छंद जोपावेत, परंतु घरच्या कामात त्याना मदत करावी. पती - पत्नी रहात असू तर, घरात पत्नीच्या बरोबरीनी काम करा. स्वत:ची कामे स्वत:च करावीत. साधेपणाने स्वत:च्या उत्पन्नाच्या चौकटीतच राहण्याची सवय करावी, मुलाकडे सुनेकडे पैसे मागू नयेत. नातवंडे अभ्यास करीत असतील तर रेडिओ, टी.व्ही. लावू नका. त्यांच्या अभ्यासात व्यत्यय येईल असे काही करू नका. घरात वितंडवाद आपल्यामुळे नसावा. चिडचिड करू नये. एकंदर काय तर घरातील कुटुंबात वातावरण प्रसन्न व आनंदी राहील यासाठी जेष्ठांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत.

**सौ. मोनिका दिलीप कुवर**
अंबरनाथ (पूर्व)

●●●

***दिशा संपर्क दूरध्वनी***
**२५४२६२७०**

# पूर्व आणि पश्चिम

*पूर्व व पश्चिम गोलार्धातील विचार, परंपरा यात मूलभूत फरक आहे. त्या अनुषंगाने एका सुंदर निबंधावरील हा लेख - संपादक*

विसाव्या शतकाच्या साधारण मध्यावर जेट युगाचा प्रारंभ झाला. मात्र विसावं शतक संपता संपता दूरचित्रवाणी, दूरध्वनी आणि संगणक या क्षेत्रात झालेल्या क्रान्तिकारी सुधारणांमुळे सारं जग जवळ आलं. सामान्य माणसंही या ना त्या कारणानं जगभर फिरू लागली. एकमेकांच्या संस्कृतीची ओळख होऊ लागली. जीवनपद्धतीमधील साम्य आणि फरक याची माणसं नोंद घेऊ लागली. भौतिक सुखाचा मनमुराद आस्वाद घेऊन कंटाळलेल्या काही पाश्चिमात्यांना आध्यात्मिकतेच आकर्षण वाटू लागल तर पूर्वेकडील माणसाला पाश्चिमात्यांचे भौतिक सुख आकर्षित करू लागले आणि मग या सरमिसळीचा संभाव्य धोका ओळखून आपापल्या विचारसरणीचे, संस्कृतीचे महत्त्व रेटणारे विचारही प्रकर्षाने पुढे येऊ लागले.

**डी. टी. सुझुकी :**

हा सारा कोलाहल सुरू होण्याच्या पूर्वी म्हणजे जवळ जवळ ५० वर्षापूर्वी डी. टी. सुझुकी या ऋषितुल्य जपानी तत्त्ववेत्त्यानं 'पूर्व आणि पश्चिम' या विषयावर एक प्रदीर्घ लेख लिहून या दोन विचार सरणींमधील भेद स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला होता.

१८७० साली जपानमध्ये जन्मलेला हा तत्त्ववेत्ता झेन पंथाच्या तत्त्वज्ञानाचा एक मोठा भाष्यकार म्हणून साऱ्या जगात प्रसिद्ध होता. इंग्रजी भाषेवर विशेष प्रभुत्व असणाऱ्या सुझुकींनी झेन व बौद्ध धर्मग्रंथांची इंग्रजीत भाषांतरे केली. वयाच्या ९५ व्या वर्षी म्हणजे १९६६ मध्ये आपल्या मातृभूमीत येऊन देह ठेवलेल्या या थोर जपानी तत्त्ववेत्त्यानं आयुष्याची जवळ जवळ ४० वर्ष अमेरिकेत राहून तेथील विद्यापीठांत प्राध्यापक म्हणून काम केल होतं आणि म्हणूनच या दोन्ही संस्कृतींचा प्रदीर्घ अनुभव घेतलेल्या त्यांच्या लेखाला एक विशेष महत्त्व आहे. परंतु त्याहीपेक्षा दोन प्रतिभावंत कवींच्या काव्यरचना घेऊन त्यातून दिसणाऱ्या जीवनदृष्टीच्या तुलनेवर त्यांनी आपल्या लेखाची उभारणी केल्यामुळे त्या तात्विक विचारांतही एक खास रंगत निर्माण झाली आहे.

**बाशो आणि त्याच हायकू :**

बाशो हा १७ व्या शतकांत होऊन गेलेला एक थोर जपानी कवी. त्यानं लिहिलेल्या एका फक्त १७ अक्षरांच्या (जपानी) हायकूकडे सुझुकी आपलं लक्ष्य वेधतात. त्या हायकूचं त्यांनी इंग्रजीत केलेल रूपांतर -

When I look carefully
I see the nazuna blooming
By the hedge!

या छोट्याशा हायकूतील मर्म स्पष्ट करताना सुझुकी म्हणतात, बाशो हा बहुधा एखाद्या खेड्यातल्या आडवाटेनं कुठेतरी जात होता. अचानक त्याची दृष्टी एका झुडुपाच्या कुंपणाकडे गेली आणि जसा तो त्या झुडुपाच्या जवळ पोहोचला तेव्हा त्याला चकित करून टाकणारी एक गोष्ट तिथे आढळली. त्या झुडुपाच्या आधारानं वाढणाऱ्या 'नाझुना' नावाच्या एका रानवट रोपट्याला कुणाचंही मन मुग्ध करून टाकणारा बहर आला होता. बाशो ही एक सरळसोट ढोबळ घटना या हायकूत व्यक्त करतो. मात्र त्या हायकूची अखेर तो 'काना' या जपानी भाषेतील एका

अव्ययानं करतो. या अव्ययाचा वापर कौतुकानं झालेल्या आनंदाची भावना व्यक्त करण्यासाठी केला जातो. इंग्रजीत त्याला समांतर शब्द नसल्यामुळे सुझुकींनी उद्गारवाचक चिन्हाचा वापर केला आहे.

सुझुकी म्हणतात - बाशो हा निसर्गात रमणारा, किंबहुना निसर्गाशी एकरूपता साधू पाहणारा कवी आहे. अशा प्रकारच्या इतर कवींप्रमाणे त्यालाही निसर्गाच्या नसानसांतून वाहणाऱ्या प्रवाहाचे ठोके जाणवतात. बहुसंख्य पाश्चिमात्य कवी निसर्गाचं सौंदर्य न्याहाळतात, त्यान वेडे होऊन त्या सौदर्याची वर्णनं करतात पण निसर्गाशी एकरूप होण्याचा विचारही त्यांच्या मनात येत नाही. कारण ते मानवाला निसर्गाहून वेगळा मानतात. मानवाच्या सुखासाठी, मानवानं वापरण्यासाठी निसर्ग निर्माण झाला आहे अशी त्यांची धारणा असते. परंतु पूर्वेकडचा माणूस मनोमन ''वृक्षवल्ली अम्हां सोयरे'' असे मानणारा असतो. स्वत:ला तो चराचर सृष्टीचा घटक मानतो आणि म्हणूनच अत्यंत दुर्लक्षित असं ते नाझुनाचं रानवट रोपट त्या झुडुपाच्या कडेला बहरताना जेव्हा बाशोन पाहिल तेव्हा काय दिसलं त्याला? त्या रोपट्याचा निरुपद्रवीपणा, नम्रता आणि कौतुकाच्या नजरेचीही अपेक्षा न ठेवणारी निरिच्छता. हे सारं पाहून बाशो मंत्रमुग्ध झाला. त्या नाजूक फुलांच्या सौंदर्यात त्याला दैवी तेज दिसलं. त्या फुलाची प्रत्येक पाकळी त्याला जीवनाच गूढ उकलून दाखवीत होती.

सुझुकी म्हणतात - हिमालयाची भव्य उत्तुंगता आणि पॅसिफिकची विशाल विस्तीर्णता पाहून कुणालाही अनंताची जाणीव होते. पण जेव्हा एखाद्याचं मन काव्यात्मकतेनं अथवा कोणत्यातरी गूढ शक्तीच्या प्रभावान उमलू लागतं तेव्हा त्या मनाला गवताच्या साध्या पात्यातही असणार दैवी शक्तीचं सौंदर्य जाणवू लागतं आणि त्या जाणीवेनं ते मन अव्यक्ताकडे झेप घेऊन स्वर्गीय सुखाच्या आनंदात डुंबू लागतं. सुझुकीच्या या विचारानं मला आठवण झाली ती कविवर्य बोरकरांच्या खालील काव्यपंक्तीची -

हृदयच जेव्हा होते कोकिळ
    जरठ वनांतही फुले वसंत
हृदयच होते भजन जेधवां
    तृणातही भेटे भगवंत

**टेनिसन आणि त्याची काव्यरचना :**

यानंतर सुझुकी वळतात टेनिसनच्या खालील काव्यरचनेकडे -

Flower in the crannied wall
I pluck you out of the crannies
Hold you here, root and all in my hand
Little flower - but if i could understand
What you are, root and all and all in all
I should know what God & man is.

सुझुकी म्हणतात - टेनिसनची ही काव्यरचना निवडण्याचं मुख्य कारण म्हणजे ही कविताही एका रानवट रोपट्यावर केली आहे. हे रोपटं एका भिंतीला पडलेल्या भेगेतून वर आलं आहे. त्यावरही एक सुंदर फूल आलं आहे. पण असं ते सुंदर रोपटं आणि त्यावरचं फूल पाहून टेनिसन काय करतो?

तो ते फूल तोडून हातात घेतो. ते ही मुळासकट उपटून. कदाचित त्याचंही मन बाशोसारखं दिपलं असेल. पण बाशो फूल तोडत नाही. तो त्याला नुसता न्याहाळतो आणि विचारमग्न होते. त्याच्या मनात काही दिव्य कल्पना निर्माण होतात पण त्याही तो शब्दांत मांडत नाही. एका उद्गारवाचक शब्दांत आपल्या साऱ्या भावना तो व्यक्त करतो. कारण त्या भावना आणि ते विचार इतके उत्तुंग असतात, इतके विशाल असतात की त्या अव्यक्त जाणीवांना व्यक्त करण्यास शब्द असमर्थ असतात आणि त्या कवीलाही त्याची गरज वाटत नाही. त्यानं धारण केलेल्या मौनात त्या व्यक्ततेचं सामर्थ्य असतं.

आणि टेनिसन ... तो जसा कृतिशील आहे तसाच तो पृथक्करणशीलही आहे. तो फूल सरळ तोडून हातात घेतो. ते ही रोपट मुळापासून उपटून. ज्या मातीतून ते रोपट वर आल होत त्या मातीपासून त्या रोपट्याला तो अलग करतो. या अतिरेकी कृत्यानं त्या रोपट्याचा जीव जातो. पण टेनिसनला त्या रोपट्यावर कोसळलेल्या दुर्दैवी विधिलिखिताची खंत नाही. त्याची जिज्ञासापूर्ती त्याला अधिक महत्त्वाची वाटली. काही वैद्यकीय शास्त्रज्ञांप्रमाणे त्याने कदाचित त्या फुलाची चिरफाडही केली असती. कवितेच्या दुसऱ्या चरणांत टेनिसन त्या फुलाला उद्देशून म्हणतो - ''मी जर तुला समजू शकलो, तुझी मुळं, तुझी उत्पत्ती, तुझा जीवनव्यवहार हे सारं सारं समजू शकलो तर कदाचित मला परमेश्वराचं ज्ञान होईल. आणि मानवाविषयीचही ज्ञान होईल.'' म्हणजे टेनिसनच्याही मनात परमेश्वराविषयीच कुतुहल आहे. पण तो बुद्धिनिष्ठ आहे. त्याच्याकडे भावनेची खोली कमी आहे. श्रद्धा तर फार दूर राहिली आणि त्या बुद्धीच्या माध्यमांतून हे सारं गूढ उकलावं अशी त्याची इच्छा आहे. शिवाय ईश्वर, निसर्ग आणि मानव यांच्यामधील अतूट नात्याची त्याला कल्पनाही नाही. टेनिसनच्या जिज्ञासू आणि कृतिशील पण आक्रमक चैतन्यवृत्तीच्या समोर त्या फुलाला स्पर्शही न करता नुसता निरखून पाहणारा आणि त्यातून चिरंतनाचा स्पर्श अनुभवणारा बाशो कदाचित अनेकांना बाह्यत: निष्क्रिय वाटत असेल पण त्याची ती तथाकथित बाह्य निष्क्रियता पाहणाऱ्यांना त्याची आंतरिक प्रगति कशी जाणवणार? अशा प्रकारे या दोन कवींच्या काव्यरचनांची आणि त्या अनुषंगाने त्यांच्या मानसिकतेची तुलना करून सुझुकी पौर्वात्य मन आणि पाश्चिमात्य मन यांची वैशिष्ठ्ये सांगतात.

**पाश्चिमात्य मन :**

पृथक्करणशील, चिकित्सक, भेद जाणणारं, अनुमान काढण्यासाठी धडपडणारं, व्यक्तिवादाचा पुरस्कार करणारं, बुद्धिवादी, विज्ञानवादी, वस्तुनिष्ठ, सामर्थ्याचा वापर तत्परतेने करणारं, स्वत:स रेटणारं.

**पौर्वात्य मन :**

संयोग साधू पाहणारं, एकात्मतेवर भर देणार, चिकित्सा टाळणार, आत्मनिष्ठ, विशिष्ट मतप्रणालीवर ठाम श्रध्दा ठेवणारं, अंतर्ज्ञानावर विश्वास ठेवणारं, आध्यात्मिकतेमध्ये व्यक्तिवादी पण सामाजिकतेमध्ये गटवादी.

**चुआंग - त्से ची कथा :**

यानंतर सुझुकी वळतात ते चुआंग त्से या २३०० वर्षापूर्वी होऊन गेलेल्या चिनी साधूच्या कथेकडे. परमेश्वराची निर्मिती पूर्णत्वास जाण्यापूर्वीच्या काळात सर्वत्र काहीसा गोंधळ होता. Confusion होतं. त्या काळात कॉनटॉन हा एक अद्‌भुत जीव होता. त्याला कोणतीही बाह्य इन्द्रिये नव्हती. पण त्याच्या अद्‌भुत सान्निध्यामुळे त्याच्या अनेक मित्रांना अलौकिक यश संपादन करता आलं. या यशाची काहीतरी भरपाई करायला हवी अशा विचारानं प्रेरित होऊन त्या मित्रांनी अस ठरवल की कॉनटॉनला आपण एक एक ज्ञानेंद्रिय बहाल करून आपल्यासारखा संवेदनक्षम बनवायचं. याप्रमाणे ते त्याला एक एक ज्ञानेन्द्रिय बहाल करू लागले. शेवटी सर्व ज्ञानेंद्रिये देऊन झाल्यावर आता तो आपल्यासारखा संवेदनाक्षम होईल अशा आनंदात असणाऱ्या त्या मित्रांना समजल की कॉनटॉन मरण पावला. सुझुकी म्हणतात - ''The East is Chaos and the West is group of those grateful, well meaning, but undiscriminating friends.'' ही सुंदर रूपकात्मक कथा वाचा आणि त्यावर स्वत:च विचार करा.

**यांत्रिकीकरण :**

यानंतर सुझुकी वळतात ते यांत्रिकीकरणाकडे. विज्ञानावादी मनाच्या पाश्चिमात्त्यांनी आपली सारी बुद्धिमत्ता

वेळोवेळी वापरून आपल्या श्रमांत बचत करणारी अनेक सुखसोयीची साधने शोधून काढली. पूर्वेकडील माणसांना मात्र ते शारीरिक कष्ट उपसत राहणंच योग्य वाटल. कारण the East does not like to be machine minded, to turn itself into a slave to the machine. आपल्या कामावरचं प्रेम हाच पूर्वेचा एक फार मोठा गुण.

चीनमधला एक शेतकरी विहिरीतून एक एक बादली पाणी काढून शेतातील झाडांना पाणी देत होता. ते पाहून एक वाटसरू त्याला म्हणाला - 'एखादा पंप का बसवून घेत नाहीस म्हणजे तुझे श्रम वाचतील' यावर तो शेतकरी म्हणतो - 'माझे श्रम वाचतील हे तर मला ठाऊक आहे; पण म्हणूनच मला पंप बसवायचा नाही. कारण त्यामुळे मी सुस्त, आळशी होईन.'

पाश्चिमात्यांना अनेकदा प्रश्न पडतो की चीन सारख्या देशाने औद्योगिक क्रान्तीचा विचार का केला नाही? मॅग्नेट, कागद आणि गनपावडर या सारख्या वस्तूंचा शोध लावणाऱ्या देशात यंत्रनिर्मितीचा ध्यास का घेतला नाही? रसायनशास्त्र, वैद्यक, गणित आणि खगोलशास्त्रांत प्रगती साधलेल्या भारतानं यंत्रामुळे मिळणाऱ्या सुविधांकडे दुर्लक्ष का केल असावं? सुझुकी म्हणतात - पूर्वेकडील माणूस आपल्या जीवनावर प्रेम करतो आणि आपल्या जीवनपद्धतीवरही प्रेम करतो. कोणतही काम करतानां त्यांत तो आनंद घेतो. ते काम कसं तरी संपवावं अस त्याला वाटत नाही. सुझुकी पुढे म्हणतात, - ''Mechanical devices are far more efficient & accomplish more but the machine is impersonal and non - creative and has no meaning. Mechanization means intellection and as the intellect is primarily utilitarian there is no spiritual estheticism or ethical spirituality in machine.

सुझुकींच्या या भाष्यांन विशेषत: त्यांतील Esthetics च्या निर्देशानं मला आपल्याकडील पूर्व जीवनाची आठवण झाली.

आपल्याकडे पूर्वी स्त्रिया घरीच जात्यावर दळत असतं. पण त्याचं ते दळणं ओव्या म्हणत म्हणत चालायचं आणि त्यामुळे त्यातील श्रम न जाणवता उलट आनंद मिळत असे. तसंच ते कांडण. त्यातील लयबद्धता. शिवाय या साऱ्या कामात सहजीवनाचाही आनंद मिळे. शेतात काम कारणारा शेतकरी मोटेनं पाणी काढताना सुंदर गाणी म्हणायचा आणि मातीची सुबक भांडी बनवणारा कुंभार तर स्वत:ला त्या सर्वश्रेष्ठ निर्मात्याचा अंश मानून ती गाडगी बनवण्यात धन्यता मानत असे. एक प्रकारचा आनंद घेत असे. आता ती सारी काम यंत्रावर होतात. श्रम वाचले, वेळही वाचला. पण तो आनंद नाहीसा झाला आणि ते काव्यही इतिहासजमा झाल. असो.

या संपूर्ण विवेचनाची सांगता करताना शेवटी सुझुकी म्हणतात -

व्यक्ती आणि यंत्र या दोन्ही गोष्टी मुळांत एकमेकांशी विसंगत आहेत आणि या विसंगतीमुळेच पाश्चिमात्यांच्या जीवनांत मानसिक तणाव निर्माण झाला आहे. व्यक्ती ही स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आणि व्यक्तिगत जबाबदारी ध्वनित करते. तर यंत्र ही आकलन, शून्यमनस्कता सर्वांच्या आवाक्यात आणणं आणि सामूहिक जीवन अशा सर्वांची मिळून उत्पत्ती आहे. यांत्रिक मानसिकतेच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास व्यक्तिगत जबाबदारीला अर्थ उरत नाही.

स्वातंत्र्य ही अशीच एक अर्थशून्य कल्पना आहे. आपण ज्या समाजात राहतो तो समाज या ना त्या मार्गानं आपल्या शारीरिक, मानसिक हालचालींना पायबंद घालत असतो आणि म्हणून केवळ बाह्य सुखाचा उपभोग हेच स्वातंत्र्य मानल्यास त्याचा जागोजागी संकोच होतो. या उलट पूर्वेकडचा माणूस सुखोपभोगाची इच्छा हेच बंधन मानतो व त्या बंधनातून मुक्ती हेच खरेखुरे स्वातंत्र्य मानतो.

एक व्यक्ती म्हणून आपल्यामध्ये जी निर्मितीक्षमता असते तीही यंत्रनिर्मितीमुळे नाहीशी होते. व्यक्तिमत्त्वाचा

संकोच होतो. मानवाची कुचंबणा होते आणि ही सारी कुचंबणा यांत्रिक गुलामगिरीत सहन करावी लागत असल्याने त्याचा मानसिक तणाव वाढतच जातो.

सुझुकी साहेबांनी म्हटल्याप्रमाणे आता तर पूर्व आणि पश्चिम हा भेदही नष्ट होत चालला आहे. सारं जग आता यांत्रिकीकरणात अडकल आहे. या दुष्ट चक्राचे काटे आता उलट फिरवणं ही अशक्य आहे. कमीत कमी ही सारी परिस्थिती डोळसपणानं स्वीकारली तर यांत्रिकीकरणांतून निर्माण होणारे तणाव थोडे कमी होतील.

पण पौर्वात्य संस्कृतीच्या प्रभावान झिरपलेल्या ज्या मूलभूत प्रेरणा आहेत, जी जीवनदृष्टी आहे, जी निसर्गाशी एकरूपता साधणारी प्रवृत्ती आहे, व्यष्टीतून समष्टीशी संयोग साधू पाहणारी एकात्मता आहे, आणि शेवटी सर्वांत महत्त्वाच म्हणजे काव्यात्मकतेने अथवा कोणत्या तरी गूढ शक्तीच्या प्रभावाने उमलू शकेल अस श्रद्धाळू मन आहे. या सर्वांची जर जपणूक केली तर सुझुकी म्हणतात त्याप्रमाणे अशा उमलत्या मनाला गवताच्या पात्यांतही असणार दैवी शक्तीचं सौंदर्य जाणवू लागेल आणि त्या जाणीवेनं ते मन अव्यक्ताकडे झेप घेऊन स्वर्गीय सुखाच्या आनंदाचा उपभोग घेईलआणि मग पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव पचवून पौर्वात्य संस्कृती एका नवीन आविष्कारांत ठामपणे उभी राहिलेली दिसेल.

**Essays in Philosophy**

या पुस्तकांतील डी. टी. सुझुकी यांच्या '**East and West**' या निबंधावर आधारित.

**श्री. नरेन्द्र नाडकर्णी**
सीडी - १०१, सी -१,
श्रीरंग सोसायटी, ठाणे
दूरध्वनी : २५३३३१६०
E mail : nd_nadkarni@yahoo.com.

●●●

**मार्च मधील आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्ताने श्रेष्ठ महिलांची विशेषणे**

१) आयर्न लेडी - स्व. इंदिरा गांधी
२) भारताची सुवर्णकन्या - पी. टी. उषा
३) भारत कोकिळा (हिंद का बुलबुल) - सरोजिनी नायडू
४) ट्रॅजेडी क्वीन - मीनाकुमारी
५) ड्रीमगर्ल (स्वप्नसुंदरी) - हेमामालिनी
६) स्वरसम्राज्ञी - लता मंगेशकर
७) गानहिरा - कै. हिराबाई बडोदेकर
८) रुपेरी पडद्यावरील ग्रँड ओल्ड लेडी - लीला मिश्रा
९) भारताची गझल सम्राज्ञी - बेगम अख्तर
१०) प्रिन्सेस ऑफ ख्याल गायकी - किशोरी आमोणकर
११) भारताची सांस्कृतिक राजदूत - कमलादेवी चट्टोपाध्याय
१२) भारताच्या मॅडम माँटेसरी - ताराबाई मोडक
१३) बा - कस्तुरबा गांधी
१४) कैसर - ए - हिंदी - पंडिता रमाबाई
१५) गणितातील कॉम्प्युटर - शकुंतलादेवी
१६) लेडी ऑफ द लॅम्प - फ्लॉरेन्स नाइटिंगेल
१७) ऑर्लिन्सच्या कन्या (मेड ऑफ ऑर्लिन्स) जोन ऑफ आर्क
१८) मेडन क्वीन - राणी एलिझाबेथ
१९) सन रे (सूर्यकिरण) - मादाम माँटेसरी
२०) क्वीन ऑफ विम्बल्डन - मार्टिना नवरातिलोव्हा
२१) महाराष्ट्राच्या सरोजिनी - अवंतिकाबाई गोखले
२२) केस्तर - सिमान दि बोवा

**संकलित**

# ग्राम विकास - राष्ट्र विकास

*खरा भारत ज्या गावांमध्ये आहे त्या गावांची आजची अवस्था चिंतनीय आहे. पण अपवादात्मक का होईना प्रयत्न सुरू झालेत - संपादक*

भारत स्वतंत्र झाल्यानंतर आपल्या देशातील सर्व समाज धुरिणांना तसेच जेष्ठ नेत्यांनी एका महत्वाच्या विषयासंबंधी महात्मा गांधीजींशी चर्चा केली. तो विषय होता या पुढे आपल्या देशाच्या विकासाची दिशा काय असू शकेल, त्यावेळी महात्मा गांधीजींनी सर्वांसमोर ग्राम स्वराज्याचा प्रस्ताव ठेवला. ग्राम विकासातून राष्ट्र विकास होईल. यावर गांधीजींचा विश्वास होता. त्यांनी सांगितले की, देशाच्या लोकसंख्येचा विचार करता ७२% जनता ही खेडेगावात राहते. अशा लोकांचा विकास होण्याने आपोआप देशाचा विकास साधला जाणार आहे. परंतु त्यावेळी आपल्या देशाचे पंतप्रधान असलेले पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मनात काही वेगळाच विचार चालू होता, त्यांच्या मनात रशियाचा आदर्शवाद ठाण मांडून बसला होता. रशियाची त्यावेळेची भौतिक प्रगती पाहून पंडित नेहरू अत्यंत प्रभावित झालेले होते. अर्थातच रशियाच्या विकासची प्रेरणा ही समाजवादी व्यवस्था असल्याने पंडितजींनी आपल्या भारतीय घटनेतही त्याचाच आवर्जून उल्लेख केला. तसेच त्या आधारावर मोठ्या मोठ्या उद्योगांची सुरुवात केली. याचा परिणाम शहरे वाढत गेली आणि त्यामुळे स्वाभाविकपणे गावाकडचा/खेड्यांतील माणूस हा आपला शेती व्यवसाय सोडून शहराकडे धाव घेऊ लागला. आज त्याचे परिणाम आपण पाहत आहोत.

महात्मा गांधींजींनी देशाच्या समग्र विकासाची कल्पना केलेली होती. त्यांना केवळ भौतिक विकास मान्य नव्हता, कारण गांधीजींनी संपूर्ण भारत जवळून पाहिला होता. त्या आधारावरच ते या देशाच्या विकासाचे चित्र रंगवत होते अथवा त्याबाबतच्या स्पष्ट कल्पना त्यांच्या मनात होत्या. कोणत्याही व्यक्तीच्या, समाजाच्या अथवा देशाच्या समग्र विकासासाठी केवळ भौतिक विकासाची दृष्टी असून चालणार नाही तर, अध्यात्मिकतेच्या भाव जागरणानेच या देशातील कोणतेही कार्य यशस्वी होऊ शकते हा त्यांचा आतापर्यंतचा अनुभव होता.

सध्याचे पंतप्रधान मा. मनमोहन सिंग यांचे म्हणणे आहे की, केन्द्र सरकार द्वारा प्रतिवर्ष सतरा हजार कोटी रुपये ग्राम विकासासाठी दिले जातात; परंतु त्याचे अपेक्षित परिणाम मात्र अजूनही दिसत नाहीत. आपले माजी पंतप्रधान मा. राजीव गांधी यांनी सांगितले होते की ग्राम विकासासाठी दिलेल्या एकूण रकमेपैकी केवळ १५% रक्कम ही त्या गावांपर्यंत प्रत्यक्षात पोहचते. तसेच आपले भूतपूर्व राष्ट्रपती मा. नीलम संजीव रेड्डी यांनी सांगितले होते की 'मी ज्या देशाचा राष्ट्रपती आहे त्या देशातील अधिकांश जनतेला दोन रुपये प्रतिदिनचे जेवण सुद्धा उपलब्ध होत नाही. या देशातील ५६% जनता ही निरक्षर आहे. आरोग्य, व्यवसाय, शिक्षण, तसेच जीवनाची सुरक्षा इत्यादी सुविधांबाबत आजही ग्रामीण जनता वंचित आहे.'

स्वामी विवेकानंदांनी सुद्धा सांगितले होते की, जरी जगातील सर्व संपत्ती जरी प्रत्येक गावाला दिली तरी जोपर्यंत गावातील प्रत्येक व्यक्तीची मानसिकता आपण बदलत नाही तोपर्यंत ग्राम विकास होणे शक्य नाही.

भारतामध्ये 'ग्राम' हा अति प्राचीन शब्द आहे. रामायण व महाभारताच्या कालखंडात नगर-ग्राम अस्तित्वात होते. मार्कंडेय पुराणामध्ये 'ग्राम' या संकल्पनेबद्दलचा उल्लेख असा आहे.

''तथा शुद्धजना: प्राया: सुसमृद्धा कृषि जन:।
क्षेत्रपयोभूमद्टे य: निवसति सं: ग्राम: इति उच्यते।''

(जेथे ग्राम शिल्पी रहात आहेत, तसेच समृद्ध शेतकरी रहात आहेत अशा उपयुक्त क्षेत्रात निवास केले जाते त्यास 'ग्राम' संबोधले जाते.)

कौटिल्य अर्थशास्त्रामध्ये ग्राम-रचना बाबतचे सूत्र तसेच ग्रामव्यवस्थांची माहिती दिलेली आहे. संत तुलसीदासांनी रामचरित मानसच्या उत्तरकाण्डात अयोध्या नगरीचे वर्णन करताना आदर्श ग्रामाची कल्पना दिलेली आहे. संत तुकडोजी महाराज यांनी ग्राम-गीता नावाने ग्रंथ लिहिला आहे. पूजनीय श्री. पांडुरंग शास्त्रींनी ऋषी व कृषी या विषयावर समाज प्रबोधन केलेले आहे. देशाचा विकास करताना अनेक संत महंतांनी ग्राम विकासाच्या दृष्टीने चिंतन तसेच प्रयोग केलेले आहेत.

श्रीमान नानाजी देशमुख यांचे नाव आपल्यापैकी अनेकांना ठाऊकही नाही ज्यांनी चित्रकूट परिसराच्या आसपासच्या पाचशे पेक्षा अधिक गावांमध्ये आरोग्य, शिक्षण, स्वावलंबन, साक्षरता आणि समृद्धी या पाच विषयांच्या आधारावर अनेक प्रयोग प्रारंभ करून देशाला एक नवी दिशा दिलेली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये अण्णा हजारेंनी आदर्श गाव संकल्पना अनेक गावांमध्ये प्रत्यक्षात साकार केलेली आपण पाहतो. याचे परिणाम महाराष्ट्र सरकारने या आदर्श गाव संकल्पनेचे शंभर पेक्षा अधिक गावांमध्ये प्रयोग केलेले आहेत. कुऱ्हाड बंदी, चरस बंदी, नशा बंदी, नसबंदी, श्रमदान या पाच सूत्रांच्या आधाराने अण्णा हजारे यांनी 'राळेगणसिद्धी' या गावाचा कायापालट केलेला आहे. संपूर्ण देशात एक आदर्श गाव म्हणून या गावाला भेट देणारे व त्यापासून प्रेरणा घेणारे अनेक परदेशी संशोधक या ठिकाणी येत असतात. महात्मा गांधी यांनी ग्राम विकाससंबंधी लिहिले आहे की, ''इंग्रजांनी शहरांच्या माध्यमातून ग्रामीण जनतेचे शोषण केलेले आहे. ग्रामीण जनतेच्या रक्ताच्या सिमेंट वर अलिशान शहरे निर्माण झाली आहेत. मला असे वाटते की जे रक्त शहरांच्या नसानसांतून दौडत आहे ते पुन्हा एकदा प्रत्येक गावागावांमधून वाहताना दिसायला हवे.''

वेदमाता गायत्री ट्रस्ट, शांतिकुंज यांनी तर 'ग्रामविकास' या संबंधी अनेक प्रकारचे साहित्य छापून प्रकाशित केलेले आहे, तसेच अनेक प्रकारचे कार्यही संस्था करीत आहे. त्यांनी सुरू केलेले सामाजिक समरसता व स्वावलंबन सारखे प्रयोग अत्यंत सफल झालेले आहेत.

गुजरात राज्य सरकारने सुद्धा 'गोकुळ ग्राम योजने' द्वारे अनेक गावांमध्ये क्रांतिकारी बदल घडवून आणलेले आहेत. एक स्वच्छ व सुंदर गाव निर्माण करताना त्यामध्ये ग्राममंदिरापर्यंत क्राँक्रीट मार्ग तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी चांगले मैदान इत्यादी सुविधा निर्माण केलेल्या आहेत. मध्य प्रदेश राज्य सरकारने सुद्ध 'गोकुळ ग्राम' योजने अंतर्गत चार 'ज' चे नियोजन केलेले आहे यामध्ये जल, जंगल, जन व जानवर यांच्या विकास कार्यासाठी सांसद निधीचे योजनापूर्वक नियोजन केलेले आहे. एका विधान सभा क्षेत्रामध्ये प्रारंभ स्वरूपात पाच गावे निवडून त्यांच्या विकासाचे नियोजन करून त्यात प्रयत्नपूर्वक यश मिळविलेले आहे.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनी सुद्धा ग्राम विकासाची पाच सूत्रे सांगितलेली आहेत.

१) आर्थिक संकल्पना
२) कृषी उद्योग
३) निश्चित व पर्याप्त विद्युत आपूर्ती
४) सूचना एवं संचार तकनिकी की सुविधा
५) शहरी सुविधाओं की ग्रामों में उपलब्धता

(Pura-Provision of Urban Facilities in Rural Areas)

समग्र ग्राम विकास करताना कोणत्याही एका आदर्शानुसार हे कार्य होणार नाही. आपल्या देशाची भौगोलिक स्थिती लक्षात घेता अशा प्रकारच्या आदर्शवत कल्पनांमध्ये अंतर असू शकते परंतु ग्राम विकासाचा आधार हा एकच असेल. देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात किमान एक गाव समग्र ग्राम विकासासाठी निवडावयास हवे. या ग्रामीण जीवनाचा सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकास हा भारतीय जीवनमूल्यांच्या आधारावरचन व्हावयास हवा. गाव एक परिवार आहे ही भारतीय परंपरा यातून पुढे यावयास हवी. येथे राहणाऱ्या सर्वांचे जीवन परस्परपूरक व्हावे तसेच सुयोग्य शिक्षण व संस्कारक्षम पारिवारिक वातावरण येथे असावे. आर्थिक संपन्नता असावयास हवी. रोगमुक्त, व्यसनमुक्त तसेच पर्यावरणाबाबत सजगता आणि परस्परांचे स्वावलंबी व समरसतायुक्त जीवन येथे विकसित होण्यासाठी वातावरण निर्माण करावे लागेल. गावांमध्ये तसेच परिवारामध्ये ज्या काही गोष्टी घडतात त्यांचा विकास भारतीय मूल्यांच्या आधारावरच घडविण्याचे आमचे लक्ष्य असेल. केवळ भौतिक सुखसुविधा उपलब्ध करणे म्हणजे विकास एवढीच कल्पना यामागे नसून शाश्वत जीवनमूल्यांच्या आधारावर समग्र ग्राम विकास ही आमची कल्पना असावयास हवी.

ग्राम विकासाचे वरील सर्व मुद्दे लक्षात घेता अशा पद्धतीने देशभरात वेगवेगळ्या ठिकाणी अनेक कार्ये चालू असलेली आपणास आढळून येतील. ग्रामीण जनतेमध्ये अशा पद्धतीने ग्राम विकास करण्याची मानसिकता निर्माण करणे म्हणजेच या कार्याचा खरा प्रारंभ झाला असे म्हणता येईल.

**श्री. शशिकांत गाणार**
स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय,
डोंबिवली (पूर्व)

●●●

**काही मुद्दे : अभ्यासासाठी**

परीक्षेची भीती ही समस्या सर्वसाधारणपणे सर्वच मुलांमध्ये आढळते. यात अभ्यासक्रमाचा, सततच्या परीक्षेतील गुणांचा दोष आहे की पालकांच्या अवास्तव अपेक्षांचा...? खरेतर, सर्वच गोष्टींचा परिणाम म्हणजे ‘एक्झॅमिनेशन फीवर’ (परिक्षेची भीती)

यावर उपाय काय? अभ्यासाच्या पायऱ्या पहा. त्या एकूण ५ आहेत.

१) शाळेमध्ये वा क्लासमध्ये शिक्षकांचं जे शिकवणं/लिहिणं आहे. ते खूप काळजीपूर्वक, मनापासून ऐका.
२) शाळेतून घरी आलात की, वेळेवर गृहपाठ करा. तो करत असता शाळेत अगोदर शिकवलेला भाग नीट वाचा.
३) न कळणारा भाग पेन्सिलीने अधोरेखित करा.
४) तो अधोरेखित भाग पुन्हा वाचा. पहिल्यापेक्षा तो थोडे जास्त समजेल. समजा नाही कळला तर घाबरू नका; शाळेत शिक्षकांना पुन्हा विचारा.
५) दिलेला अभ्यास वेळेत पूर्ण करा. त्यासाठी पाटीपेन्सिल वापरा. मुद्दे काढायला शिका.

या दृष्टीने खालील गोष्टीदेखील लक्षात ठेवल्या पाहिजेत.

१) वाचता-लिहिताना शरीर स्थिर ठेवा. चुळबुळ करू नका.
२) एका वेळी एकाच विषयाचा, तोही अर्धा वा तासभर, अभ्यास करा.
३) अभ्यासाला बसल्यावर मध्येच उठू नका.
४) आजूबाजूच्या आवाजांकडे लक्ष देऊ नका.
५) पालथे, लोळून, झोपून वाचू लिहू नका.
६) मित्रमैत्रिणींशी गप्पा मारू नका.
७) खूप पोपटपंची करू नका.
८) लिहिताना-वाचताना येणारे कठीण शब्द समजावून घ्या. शब्दकोश वापरायला शिका आणि महत्त्वाचे म्हणजे वह्या पुस्तके यांसह वापरावयाच्या सर्व वस्तू सहज सापडतील अशा व व्यवस्थित ठेवा.

**संकलित**

# शांती

*जीवनात शांती चे महत्त्व मोठे आहे. शांतता मिळवण्याच्या दृष्टीने विचार देणारे हे चिंतन - संपादक*

जीवनात शांती महत्त्वाची असते. शांती नसेल तर जीवन नकोसे वाटते. आज जे काही आपण कार्य करतो, मेहनत घेतो त्यापाठी आपल्या जीवनात आपल्याला शांती मिळावी हा एकच उद्देश असतो. सर्व काही शांती मिळविण्यासाठीच चाललेले असते. पृथ्वीतलावरील प्रत्येक सजीव प्राण्याला शांती हवी असते. माणूस शांत नसेल तर जीवनात घडणाऱ्या गोष्टी संदर्भात तो योग्य निर्णय घेऊच शकत नाही. म्हणून मानसाने नेहमी डोके शांत ठेवून विचार करायला हवा, मन शांत ठेवायला हवे. शांत रहा म्हणणे सोपे असते. परंतु प्रत्यक्षात तसे होत नाही. कारण शांती सहजासहजी प्राप्त होत नाही. ती मिळविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी मेहनत घेण्याची तयारी ठेवावी लागते मगच शांती मिळते. परमेश्वराने मानवाला जीवन जगण्यासाठी सर्व साधने दिली आहेत. त्या साधनांचा उपयोग केल्यानंतर समाधान मिळते पण त्यापासून मानवाला शांती मिळत नाही. कारण परमेश्वराने मानवाला सर्व काही दिले पण शांती मात्र दिली नाही. ती शांती त्यांनी स्वत:जवळच ठेवली आहे. म्हणून तर माणूस आज कोणत्याही क्षेत्रात शांत दिसत नाही. नोकरी, धंदा, व्यवसाय, प्रपंचात त्याला शांती लाभलेली दिसून येत नाही. प्रत्येक व्यक्ती चिंता, भय, बेचैनी यांनी ग्रासलेली दिसून येते.

जर आपणास जीवनात शांती हवी असेल तर सर्वात प्रथम आपण एक गोष्ट करायला हवी ती म्हणजे आपण परमेश्वराजवळ जायला हवे. कारण शांती ही परमेश्वराजवळ आहे. मग आपण परमेश्वराजवळ गेल्याशिवाय आपणास शांती कशी मिळेल? परमेश्वराजवळ जायचे म्हणजे काय? त्याच्या जवळ जायचे कसे? असे अनेक प्रश्न नंतर आपल्या मनात उभे रहातात. परमेश्वराजवळ जाण्याचा एकच मार्ग आहे आणि तो मार्ग म्हणजे 'भक्ती' होय. भजन, कीर्तन, जप, तप यांच्या माध्यमानेच आपण जीवनात शांती मिळवू शकतो. परमेश्वराची मनोभावे भक्ती केल्याशिवाय किंवा आपले डोके त्याच्या पायावर ठेवल्याशिवाय आपण त्याच्या पर्यंत पोहचूच शकत नाही.

भक्ती करण्यासाठी किंवा पूजा करण्यासाठी गीतेमध्ये काही नियम सांगितले आहेत. पूजा करतांना जमिनीवर बसू नये, धूप किंवा अगरबत्ती लावून वातावरण प्रसन्न ठेवावे, स्वच्छ वस्त्र परिधान करावे वगैरे वगैरे. पण खरोखरच परमेश्वराची पूजा करतांना किंवा त्याची भक्ती करतांना या सर्व नियमांची गरज असते का? काही व्यक्ती तर दिवसातून चार - पाच तास पूजा करतांना दिसून येतात. जर आपण बारकाईने निरिक्षण केले तर आपल्याला एक गोष्ट लक्षात येईल त्या चार-पाच तासात ती व्यक्ती सर्व वेळ परमेश्वराचांच विचार मनान करीत असते का? तर नक्कीच नाही. कारण एवढा वेळ मनाची एकग्रता ठेवणे शक्यच नाही कारण मन हे चंचल असते. ते केव्हाही स्थिर नसते. प्रत्येक मिनिटाला मनात वेगवेगळे विचार येतात. परमेश्वराची पूजा करताना किंवा भक्ती करताना बाह्य देखावा न करता किंवा अधिक वेळ न वाया घालवता फक्त एकच मिनिट परमेश्वराची आठवण करा आणि ती ही आगदी मनापासून. आपले मन परमेश्वराशी संबद्ध झाले पाहिजे, मन त्यामध्ये गुंतले पाहिजे एवढेच. मग बाकीच्या देखाव्याची काहीही गरज नसते. आपला मुलगा जर अमेरिकेत शिकत असेल तर त्याची आई मुलाची आठवण यावी म्हणून धूप किंवा

अगरबत्ती लावून, आसनावर बसून किंवा स्वच्छ वस्त्र परिधान करून आठवण करीत नाही. ती जिथे जशी असेल तशा आवस्थेत त्याची आठवण करते. जेवताना, झोपताना, स्वयंपाक करताना, बाथरूममध्ये प्रत्येक ठिकाणी ती त्याची सदैव आठवण करीत असते. कारण आई मुलाला ओळखत असते, त्यांचा एकमेकांचा परिचय असतो म्हणून ती सदैव त्या मुलाची असेल त्या अवस्थेत आठवण करीत असते. परंतु आपली आणि परमेश्वराची ओळख नसते, परमेश्वर म्हणजे काय हेही आपल्याला माहीत नसते. म्हणून तर आपण हा सर्व बाह्य देखावा करीत असतो. जीवनात शांती मिळवायची असेल तर सर्वप्रथम परमेश्वराची ओळख करून घ्या, परमेश्वर म्हणजे काय हे ओळखा त्याशिवाय खरी शांती मिळत नाही.

परमेश्वर प्राप्तीसाठी आपण जो प्रयत्न करणार आहोत किंवा त्या दिशेने जो प्रवास करणार आहोत त्या प्रवासात राग, लोभ, मोह, क्रोध, अहंकार या सर्व गोष्टी सोडून द्यायला हव्यात. कारण यासर्व गोष्टी वाटेत अनेक अडथळे निर्माण करतात. प्रवासात थकवा येऊन आपण परमेश्वरापर्यंत पोहोचू शकणार नाही. म्हणून आपणास तो प्रवास अर्ध्यावरच सोडून द्यावा लागेल. केवळ शांतीच्या मार्गावरून प्रवास करूनच आपण परमेश्वराजवळ पोहोचू शकतो हे लक्षात ठेवायला हवे.

मन शांत कसे ठेवावे? शांती कशा पद्धतीने मिळवता येईल? शांती मिळविण्याचा मार्ग कोणता? यासाठी पुढील काही गोष्टी लक्षात घेणे किंवा त्यावर विचार करणे गरजेचे आहे.

१) सर्वात प्रथम शांत रहाण्याची इच्छा पाहिजे.

२) शांतीनेच जीवन जगण्याचा संकल्प केला पाहिजे.

३) शांत कसे रहावे? शांतीचा मार्ग कोणता? याचा प्रथम अभ्यास करावा.

४) शांतीचा मार्ग म्हणजे शांत रहाणे हाच होय.

५) माणसाजवळ सहिष्णुता पाहिजे.

६) घरातील सर्व व्यक्तींनी एकमेकांना समजून घेतले पाहिजे.

७) घरामध्ये वाद-विवाद, भांडणे नसावीत.

८) प्रत्येक गोष्टीत समाधानी असावे, जेवढे आहे त्यातच समाधान मानावे.

९) मनावर कोणतेही तणाव नसावेत, मनावर तणाव असतील तर वाद-विवाद, भांडणे होऊन शांती भंग पावते.

१०) प्रत्येक गोष्यीवर उपाय काढता आला पाहिजे. उपाय काढता येत नसेल, तर प्रगती करता येत नाही.

११) मुखी नेहमी भगवंताचे नाम असावे.

१२) आपले मन नेहमी परमेश्वराच्या सान्निध्यात ठेवावे.

वरील सर्व गोष्टींशिवाय कोणत्याही माणसाला जीवनात शांती मिळणे शक्य नाही.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३, सुभाष रोड, कुंभारखान पाडा,
डोंबिवली (प.), जि. ठाणे

●●●

*हे ईश्वरा, सर्वांना सुखात, आनंदात ठेव त्यातच माझे सुख सामावले आहे.*

*- एक प्रार्थना.*

# निरोप समारंभ

*आमच्या आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळेतील निरोप समारंभाचा हा अनुभव - संपादक*

दिनांक ३० जानेवारी रोजी इ. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ संपन्न झाला. आमच्या शाळेचा निरोप समारंभ दरवर्षी वैशिष्ट्यपूर्णपणे साजरा केला जातो. दरवर्षीच्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या त्याच त्या भाषणांना फाटा देऊन, विद्यार्थ्यांनी शाळेच्या ह्या छोट्या जगातून बाहेरच्या मोठ्या जगात पाऊल टाकताना काही तरी नवीन शिकून, नवा विचार घेऊन बाहेर पडावं ही त्यामागची संकल्पना असते. ह्या प्रथेला अनुसरून ह्यावर्षी श्री. मयूर कामत (Chairman - Wildlife Images and reflection) यांना आमंत्रित करण्यात आले होते. सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर बाई यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना येणाऱ्या परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या तसेच इथून बाहेर पडताना समाजात त्यांनी उत्तम नागरिक म्हणून नाव कमवावं असं सांगितलं. तसेच शाळेची दारं त्यांच्यासाठी नेहमीच उघडी आहेत. त्यांनी उत्तम यश संपादन करून शाळेत यावं आणि आपल्या आनंदात शाळेलाही सहभागी करून घ्यावं असं सांगितलं.

त्यानंतर मयूर कामत यांनी दृक्‌श्राव्य माध्यमाद्वारे विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

श्री. मयूर कामत यांना ॲनिमल प्लॅनेट तर्फे सर्वोत्कृष्ट वन्यजीवन चित्रपटकर्ते म्हणून गौरविण्यात आले. जगभरातून निवडलेल्या चित्रपटातून त्यांच्या Hope ह्या तीन मिनिटांच्या चित्रपटाची निवड करण्यात आली. आईवडिलांच्या इच्छेखातर त्यांनी पॉलिमर इंजिनिअरिंगचा अभ्यासक्रम पूर्ण केला. परंतु लहानपणापासूनच त्यांना वन्यजीवांविषयी कुतूहल आणि आवड होती. त्यात त्यांनी खोलवर अभ्यास करून हे यश मिळवलं. वन्यजीवांकडून त्यांना अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. एका लहानशा कासवाकडून ते शिकले अस्तित्वासाठीचा संघर्ष. प्राण्यांना घरात पाळण्यापेक्षा त्यांच्यातच पर्यावरणात त्यांना सोडून देण्यात अधिक आनंद आहे, असं त्यांना वाटतं. आयुष्यात प्रत्येकाने एक निश्चित ध्येय ठरवलं पाहिजे आणि ते गाठण्यासाठी अविरत कष्ट केले पाहिजे. तसेच स्वत:च्या क्षमतेवर विश्वास ठेऊन दुसऱ्यांनी केलेल्या टीकेचा सकारात्मकरीत्या स्वीकार केला पाहिजे असे ही सांगितले.

दृकश्राव्य माध्यमाद्वारे त्यांनी केलेल्या दीड तासाच्या भाषणाला विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. भाषणाच्या शेवटी त्यांनी सांगितलं, इतर सर्व प्राण्यांमध्ये मनुष्यप्राण्यालाच फक्त विचारशक्ती आहे. त्यामुळे मानवजातीच्याच भल्यासाठी माणसाने विचारपूर्वक इतर प्राण्यांचाही विचार केला पाहिजे त्यांना नष्ट होण्यापासून वाचवले पाहिजे.

इ. १० वी तील विद्यार्थिनी कु. निहारिका मुंगळे हिने श्री. मयूर कामत यांचे आभार मानले. त्यानंतर विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. विद्यार्थ्यांनी गुरुंविषयी कृतज्ञता व्यक्त करून त्यांचे आशीर्वाद घेतले. कोल्हटकराबाईंच्या भाषणाचा धागा पकडून शेवटी म्हणावसं वाटतं -

तुम न बिदा माँगो हमसे<br>
हम न बिदा देंगे तुमको<br>
साथ सदैव रहे हमारा<br>
प्रगती पथ है मार्ग तुम्हारा

**मैत्रेयी शेवडे**

●●●

अधिकार नसेल तर उपदेश करू नये.

# कोकण विभाग सार्वजनिक ग्रंथालय संघतालिका

*कोकण विभाग सार्वजनिक ग्रंथालय संघतालिका www.granthalaya.org संकेत स्थळ हा विद्या प्रसारक मंडळाचा उपक्रम. या उपक्रमाविषयीची माहिती देणारा हा लेख - संपादक*

विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने कोकण विभागातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या संघ तालिकेचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत तयार होणारी संघतालिका www.granthalaya.org या संकेतस्थळाचे उद्घाटन व संधतालिका उपक्रमाचे उद्घाटन दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ११.०० वाजता थोरले बाजीराव पेशवे सभागृहात विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्या प्रसारक मंडळाचे सदस्य व पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते. तसेच विद्या प्रसारक मंडळ संचलित सर्व शिक्षण संस्थाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे विद्यार्थी उपस्थित होते. त्याचप्रमाणे, कोकण विभागातील सार्वजनिक ग्रंथालयांचे ग्रंथपाल व पदाधिकारी देखील उपस्थित होते.

या उपक्रमाविषयी माहिती डॉ. विजय बेडेकर यांनी उपस्थितांना दिली. या उपक्रमाचा हेतू व महत्त्व सांगताना ते म्हणाले, आजच्या युगाला 'माहिती युग' असे संबोधले जाते. 'ज्ञान हीच शक्ती' ही म्हण सुशिक्षित समाजात सर्वश्रुत आहे. मानवी उत्क्रांतीच्या प्रत्येक टप्प्यात ज्ञानाचा उपयोग पायरी सारखा झालेला आहे. आधुनिक काळात माहिती आणि ज्ञानप्रसारासाठी माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जातो. शिक्षणामध्येही सर्व पातळीवर माहितीतंत्रज्ञानाला प्राधान्य दिलेले दिसून येते. आणि म्हणूनच आजचे युग माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे असेही आपण म्हणतो.

माहिती आणि ज्ञानप्रसारामध्ये ग्रंथालयांचे योगदान मोठे आहे. विशेषत: सार्वजनिक ग्रंथालयांचे एकंदर स्वरूप पाहता सर्वच समाजाला ग्रंथालय सेवा देण्याबरोबरच, माहिती आणि ज्ञानसाधनाचे संवर्धन करण्याचे महत्त्वाचे काम ही ग्रंथालये करताना आपणास दिसून येतात. परंतु मानवी समाजाला उपकारक ठरलेल्या माहिती तंत्रज्ञानाचा वापर सार्वजनिक ग्रंथालये फारसा करत नाहीत. सर्व जग जोडण्याचे सामर्थ्य असलेल्या आंतरजालाचा वापर करून आपल्या ग्रंथालयाचे संकेत स्थळ निर्माण करणारी सार्वजनिक ग्रंथालये अभावानेच आढळतात.

आर्थिक कमतरता आणि पायाभूत सुविधांचा अभाव या अडचणी सार्वजनिक ग्रंथालयाना आज आहेत. म्हणून विद्या प्रसारक मंडळ, ठाणे या संस्थेने कोकण विभागातील सर्व जिल्हा, तालुका व ग्राम पातळीवरील ग्रंथालयाची संघतालिका तयार करून जनतेसाठी एका विशिष्ट संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करून देण्याची योजना तयार केली आहे.

या योजनेचा मुख्य हेतू जगातून कुठूनही कोकण विभागातील सर्वच ग्रंथालयाची अद्ययावत माहिती वाचकांना आंतरजालाच्या माध्यमातून मिळावी हा आहे. यासाठी कोकण विभागातील सर्व ग्रंथालयांशी संपर्क साधून त्यांना आपल्या ग्रंथालयातील ग्रंथ आणि इतर वाचन साहित्याचा माहिती संग्रह करून संगणकीकृत तालिका तयार करण्याचे अवाहन केले जाणार आहे. ग्रंथालय संगणकीकरणासाठी आवश्यक संगणक प्रणाली विद्या प्रसारक मंडळाकडून सर्वच ग्रंथालयांना उपलब्ध करून देण्यात येईल. अशा प्रकारे तयार झालेल्या सर्व ग्रंथालयांची

संगणकीकृत संघतालिका विद्या प्रसारक मंडळाने खास सार्वजनिक ग्रंथालयांसाठी तयार केलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. या संघतालीकेतून कोकण विभागामध्ये कोणत्या ग्रंथालयामध्ये कोणता ग्रंथ उपलब्ध आहे हि माहिती कळू शकेल.

www.grantahalya.org या संकेत स्थळाच्या उद्घाटन प्रसंगी एकूण पाच ग्रंथालयाच्या २ लाख १ हजार ग्रंथाची माहिती या संकेत स्थळावर उपलब्ध असल्याचे उपस्थितांना पाहता आले. या उपक्रमांर्तगत सुरुवातीला प्राच्यविद्या अभ्यास संस्था ठाणे, डोंबिवली ग्रंथ संग्रहालय, जवाहर वाचनालय, कळवा. मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, नगर वाचन मंदिर, ठाणे, या पाच ग्रंथालयाची वाचनसंग्रह विषयक माहिती या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. नजीकच्या भविष्यकाळामध्ये कोकण विभागातील ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड या सर्व जिल्ह्यांतील सार्वजनिक ग्रंथालयांच्या वाचनसाहित्याची माहिती या संकेत स्थळावर टाकण्यात येईल. या संकेत स्थळावरील एकूण ग्रंथ संख्या २५ लाखापर्यंत नेण्याची योजना या उपक्रमांर्तगत आखण्यात आली असल्याचे डॉ. बेडेकरांनी आपल्या भाषणात सांगितले.

या संकेत स्थळाची बांधणी करीत असताना आलेल्या अनंत अडचणींचा उल्लेख त्यांनी केला. उदा. अनेक तांत्रिक अडचणी आल्या. म्हणजेच सर्व ग्रंथालयांमधील पुस्तकांच्या नोंदी ह्या प्रमाणित विश्वसूत्रामध्ये बांधलेल्या नव्हत्या. त्याचबरोबर संकेत स्थळावर पुस्तकांचा मराठी भाषेतून शोध घेण्याची सुविधा उपलब्ध व्हावी असाही एक विचार होता व त्यासाठी अनंत कॉर्पोरेशनचे संचालक श्री. कौस्तुभ काळे यांनी अनंत प्रयत्न करून या अडचणींवर मात केली, असे डॉ. बेडेकर म्हणाले. यानंतर श्री. कौस्तुभ काळे यांनी या संकेत स्थळाचे दृकश्राव्य सादरीकरण केले व उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. या कार्यक्रमाचे प्रास्तविक ग्रंथपाल श्री. नारायण बारसे यांनी केले. व सूत्रसंचालन श्री. अनिल भाबड यांनी केले. या उपक्रमामध्ये विशेष योगदान देणारे सर्व ग्रंथालयांचे संचालक व श्री. संदीप भावसार यांचा या प्रसंगी सत्कार करण्यात आला.

**प्रा. नारायण बारसे**

ग्रंथपाल, जोशी - बेडेकर महाविद्यालय

●●●

### पाणी ... पाणी

वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी भूजलाचा उपसा वाढला. वैज्ञानिक प्रगतीने ही गोष्टही सुकर केली, वेगवान केली. पूर्वी राहाटाने किंवा मोटेने होणाऱ्या उपशाला मर्यादा होत्या. डिझेल पंप किंवा वीजपंपाच्या ताकदीला मर्यादा नाही. पाणी जिरणे मुरणे व परणी उपसणे यातील तफावतीमुळे भूजल पातळी खाली खाली गेली. बोअर वेल्सची खोली वाढली. भूजल आटल्यामुळे जंगले कमी झाली. भोगासाठी मनुष्य पाणीच लुटत नव्हता तर जंगलाचीही तोड याच काळात प्रचंड प्रमाणात झाली. त्यामुळे भूपृष्ठ उघडे पडले. जंगले आणखी कमी झाली. भारतात नैसर्गिक समतोलाच्या निकषावर किमान २२% जंगल असले पाहिजे. हिमालयातील व दक्षिण भारतातील जंगले जमेला धरली तरी आज जेमतेम १०% जंगल शिल्लक आहे. वनस्पतीचे आवरण गेल्यामुळे पाणी मुरण्याची क्रिया अधिकच कमी झाली. जलचक्रात बिघाड तयार झाला. हे चक्र पुन्हा मूळ पदावर कसे आणायचे? याचा विचार म्हणजे पाणी-विवेक. हा विवेक शेती, कारखान्यांसकट सर्वच पाणी वापरांच्या संदर्भात करणे शक्य आहे.

**संकलित**

चोरांची संगत धरली की घातच होणार.

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)

### ❖ इ. १०वी शुभेच्छा समारंभ व वार्षिक 'पारिजातक' अंकाचे प्रकाशन

दि. ४ फ्रेब्रुवारी रोजी इ. १०वी चा शुभेच्छा समारंभ व वार्षिक पारिजातक अंकाचा प्रकाशन सोळा संपन्न झाला. उपस्थित प्रमुख पाहुणे प्रसिद्ध कलाकार मा. श्री. विजय कदम यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना शाळा, शाळेने दिलेले संस्कार, व्यक्तिमत्त्व विकास यांचे नेहमी स्मरण ठेवावे असे सांगितले.

ठाणे शहराचे भूषण, बारा पुस्तकांच्या श्रेष्ठ लेखिका सौ. श्वेता गानू यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना आपल्या भावी आयुष्याची जडणघडण करताना नेमके काय करावे, कसे वागावे, कोणते आदर्श समोर ठेवावे याबद्दल उत्तम मार्गदर्शन केले.

समारंभाचे अध्यक्ष विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ सभासद मा. श्री. वि. करंदीकर यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना शुभ आशीर्वाद दिले.

कार्यक्रमाचा समारोप माजी विद्यार्थी, नवोदित गायक श्री. आलाप भागवत याने 'पारिजातक' अंकाचे प्रकाशन करून आपल्या सहकाऱ्यांसह सुमधुर आवाजात गाणी सादर केली.

### ❖ गणित पारंगत परीक्षा :

महाराष्ट्र गणित अध्यापक मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इ. १०वी च्या 'गणित पारंगत परीक्षेत' १०वी 'अ' मधील तीन विद्यार्थ्यांना विशेष प्रशस्तिपत्र मिळाले. यशस्वी विद्यार्थी खालील प्रमाणे-

१) गणमे अमय २) देवकर मयुर ३) इनामदार अद्वैत

### ❖ चित्रकला स्पर्धा :

कोलोरामा, अप्सरा पेन्सिल आयोजित आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत मृण्मयी कोळी (९अ) हिला तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. पारितोषिकाचे स्वरूप प्रमाणपत्र, ब्रॉन्झ मेडल, रंगसाहित्य असे आहे.

### ❖ विज्ञान माहिती वर्ग :

'MT EDVCARE" या संस्थेतर्फे इं.९वी च्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान-१ मधील प्रकरण ८,९,१०,११ यांच्याशी संबंधित Audio Visual कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात हृदय, रक्ताभिसरण, मानवी रक्त, उत्सर्जन व इतर माहिती स्लाईड शो दाखवून समजावून सांगितली.

### ❖ विज्ञान पंधरवडा :

जिज्ञासा ट्रस्ट, ठाणे यांच्यातर्फे 'विज्ञान पंधरवडा २००९' साजरा करताना शाळेत अवकाश विज्ञान, प्राचीन भारतातील विज्ञान व तंत्रज्ञान, पदार्थ विज्ञानाचा इतिहास या विषयांवर विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले. इ. ६,७,८वी च्या विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाचा लाभ घेतला व वैज्ञानकि दृष्टिकोन वाढवण्याचा संकल्पही केला.

### ❖ रामायण परीक्षा :

डिसेंबरमध्ये इ.६वी साठी झालेल्या रामायण परीक्षेत ३१० विद्यार्थ्यांपैकी २२३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ३४ विद्यार्थ्यांना विशेष श्रेणी प्राप्त झाली म्हणून रामायण कथा अभ्यास समितीतर्फे शाळेला स्मृतिचिह्न मिळाले. यशस्वी विद्यार्थी पुढील प्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| १) चौगुले अदिती | (६इ) | जिल्ह्यात दुसरी |
| २) कदम सिद्धिका | (६इ) | '' तिसरी |
| ३) काळभोर प्रणिता | (६अ) | '' चौथी |

निष्काम बुद्धीचे केलेले भजन अतुलनीय ठरते.

| | | |
|---|---|---|
| ४) जंगले चेतना | (६इ) | '' चौथी |
| ५) निकम अपूर्वा | (६इ) | '' पाचवी |

❖ **कराटे :**

निहॉन शोतोकॉन कराटे दी फेडरेशन ऑफ इंडिया तर्फे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील कराटे स्पर्धेत अक्षय पाटील (६ब) याला प्रशस्तिपत्रक व कांस्यपदक या स्वरूपात तृतीय क्रमांकाचे पातितोषिक प्राप्त झाले.

❖ **नृत्यस्पर्धा :**

लायन्स क्लब ऑफ ठाणे, कोपरी यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या आंतरशालेय फोकडान्स स्पर्धेत निधी प्रभू दिग्दर्शित नृत्य इ.९वी क च्या विद्यार्थिनींनी सादर केले. यांना स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

❖ **स्काऊट-गाईड मेळावा :**

दि. १४,१५,१६ फेब्रु. या दिवशी भारत स्काऊट गाईड संस्थेतर्फे ठाणे जिल्हा मेळावा पी.ई. सोसायटी ठाणे येथे संपन्न झाला. मेळाव्यात ७ स्काऊट, १० गाईड सहभागी झाले. तसेच सहभागी सर्व विद्यार्थी साहसी खेळामध्ये उत्तीर्ण झाले. मेळाव्याचे उद्घाटन माननीय आमदार श्री. संजय केळकर यांच्या हस्ते झाले. मेळाव्याप्रसंगी स्काऊटर श्री. प्रकाश पांचाळ यांनी 'हिमालय वुड बॅग' पदवीने गौरविण्यात आले.

❖ **आदर्श प्रश्न पत्रिका :**

'दैनिक धावते नवनगर' वाशी या वृत्तपत्रात इ. १०वी च्या इतिहास विषयाची आदर्श प्रश्नपत्रिका व आदर्श उत्तरपत्रिका सौ. सुषमा बोऱ्हाडे यांनी काढली.

❖ **धान्य मदत :**

इ. ५वी ते १०च्या सर्व विद्यार्थ्यांनी मिळून वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र या संस्थेला मदत म्हणून १० पोती धान्य गोळा करून दिले.

❖ **परदेशी पाहुण्यांची शाळेला भेट :**

परदेशी पाहुण्यांच्या (U.K.) शालेय भेटीचे औचित्य साधून विद्यार्थी व पालकांसाठी वार्षिक चित्रकला हस्तकला प्रदर्शन भरवण्यात आले. चित्रकला प्रदर्शनात विषयांची, तंत्रांची विविधता होती. तर हस्तकला प्रदर्शनात मेण, कागद, आईस्क्रीमचे चमचे, पुठ्ठे, हातकागद अशी माध्यमे उपयोगात आणून विद्यार्थ्यांनी सुरेख सुबक वस्तू, मोत्यांचे दागिने अशा विविध कलात्मक वस्तू तयार केल्या.

❖ **मराठी दिन :**

दि. २७ फेब्रु. मराठी दिनानिमित्त दि. ४ मार्च रोजी इ. ५ वी ते ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

उ.५वी ६वी - १५मि. त जास्तीत जास्त मारठी भाषेतील 'म्हणी' लिहिणे.

इं ७वी ८वी - कवी कुसुमाग्रज यांची इ. ५वी ते १०वी च्या पाठ्यपुस्तकात नसलेली कोणतीही एक कविता न बघता लिहिणे.

इ. ९वी - कुसुमाग्रजांच्या पुस्तकांतील एक उतारा पाठ करून न बघता लिहिणे.

❖ **विज्ञान दिन :**

२८ फेब्रु. विज्ञान दिनानिमित्त इ.५वी ते ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी घोषवाक्य स्पर्धा तसेच इ. ५वी ६वीच्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान व्यंगचित्र स्पर्धा घेण्यात आली.

याच दिनाचे औचित्य साधून 'मराठी विज्ञान परिषद' या संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी 'विज्ञान सहल' आयोजित केली होती. ही सहल 'नेहरु विज्ञान केंद्र व नेहरू तारांगण' या ठिकाणी नेण्यात आली. या सहलीत १२

विद्यार्थी व शिक्षक श्री. शेलवले सहभागी झाले होते.

❖ **सुरक्षा दिन :**

४ मार्च हा ३८ वा राष्ट्रीय सुरक्षा दिन म्हणून साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने सहसंचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य कार्यालयाच्या आदेशानुसार इं ५वी ते ९वी च्या सर्व विद्यार्थ्यांना सुरक्षा दिन सुरक्षा शपथ देण्यात आली.

## सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा (माध्यमिक विभाग)

❖ **इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा २००८**

| इयता | परीक्षेस बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी |
|---|---|---|
| ५वी | २२ | ११ |
| ८वी | ३१ | १३ |
| १०वी | ४१ | ३४ |

सर्वात जास्त गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | गुण |
|---|---|---|
| ५वी | राज जोशी | ९४ |
| ८वी | मृण्मयी जोगळेकर | ७८ |
| १०वी | मिताली शेट्टी | ९० |

❖ **बालवीर राष्ट्रपती पुरस्कार २००८ चा निकालः**

राष्ट्रपती पुरस्कार मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे :

१. यजुर्वेद्र राव

२. अनिश शेट्टी

३. सागर झामरे

४. विनीत पितळे

प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही आमच्या शाळेत Institute of Oriental Study, Thane तर्फे U.K. (London) येथून आलेल्या १० शिक्षकांनी सोमवार दि. १६ फेब्रुवारी रोजी भेट दिली. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी सर्वप्रथम पाहुण्यांचे स्वागत केले. त्यानंतर शाळेच्या माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी शाळेचा अहवाल सादर केला. चित्रकला, हस्तकला आणि विज्ञान प्रदर्शनाला आमंत्रित शिक्षकांनी भेट दिली. विद्यार्थांनी आपापल्या प्रयोगांचे सादरीकरण केले. तसेच गणित आणि भूगोल कार्यशाळा बघून पाहुणे बरेच प्रभावित झाले. विद्यार्थ्यांच्या चित्र आणि हस्तकलेचेही त्यांनी भरभरुन कौतुक केले. अनेक विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला.

❖ **Whacky Ideas Competitions, IIT, मुंबई :**

IIT, मुंबई ने आयोजित केलेल्या Whacky Ideas च्या द्वितीय स्तर स्पर्धेत ११ प्रकल्पामधून द्वितीय पुरस्कार प्राप्त.

प्रकल्पाचे नाव - Green school

सहभागी विद्यार्थी - अमित पाटणकर आणि कौस्तुभ चिपळूणकर

❖ **रामायण परीक्षा २००८-२००९ :**

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी १९

उत्तीर्ण झालेले विद्यार्थी १८

| विशेष प्रावीण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|
| १४ | २ | १ | १ |

**१०० पैकी १०० गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावेः**

१) आकांक्षा पाटील २) परीता दानोले

## वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन



**कार्यक्रम प्रसंगी डावीकडून- वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनाचे प्राचार्य दि.कृ.नायक, डॉ. विजय बेडेकर (कार्याध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे), प्रा. जी. बी. धानोंकर (संचालक MSBTE) श्री. टी. वासू (टंडन ग्रुप ऑफ इंडस्ट्रिज) व प्रा. सौ. सुहासिनी शुक्ला( संघटक सचिव)**

वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे ही तांत्रिक शिक्षण देणारी ठाणे शहरातील एक अग्रगण्य संस्था आहे. आजपर्यंत या संस्थेतर्फे अनेक महत्त्वाच्या विषयावर व चालू तांत्रिक बदलाची जाणीव लक्षात घेवून परिषदांचे आयोजन केलेले आहे. चालूवर्षी संस्थेने Biometrics, RFID and Emerging Technology for Automatic Identification या विषयावर सातव्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन शनिवार दिनांक १० जानेवारी रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृह, चेंदणी बंदर रोड, ठाणे (महाराष्ट्र) येथे करण्यात आले होते.

ही परिषद महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (MSBTE) यांचे सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. परिषदेचे उद्घाटन प्रा. जी.बी. धानोंकर (संचालक, MSBTE, मुंबई) यांचे हस्ते करण्यात आले. सन्माननीय प्रमुख पाहुणे म्हणुन श्री. टी. वासू (मॅनेजिंग डायरेक्टर, टंडन ग्रुप ऑफ इंडस्ट्रिज) होते. डॉ. व्ही.व्ही. बेडकर (कार्याध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे) हे परिषदेचे अध्यक्ष होते.

स्वयंचलित यंत्रणा व त्याच्या विविध योजना. उदा. Biometrics, RFID इत्यादी विषयी माहिती शोधनिबंधाद्वारे उपस्थितांना करून देण्यात आली. आज अशा यंत्रणेची किती गरज आहे हे या परिषदेमुळे माहीत झाले. स्वयंचलित यंत्रणेत बाह्य माहिती गोळा करून ती कॉम्प्युटरला सिस्टिममध्ये मानवी हस्तक्षेपाशिवाय साठविली जाते. त्यामुळे स्वयंचलित प्रक्रिया घडून येते. त्यातूनच वेगवेगळ्या तंत्रांचा शोध लागला. उदा. Barcodes, radio Frequence Identification (RFID), Biiometrics, Optical Character Recognition (OCR), Smart Cards, Voice Recognition इत्यादी.

या परिषदेसाठी उद्योजक, संशोधक, अभ्यासक, नामवंत व्यक्ती, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.

मुख्य अतिथी श्री. मारवा यांनी Biometrics व RFID च्या वाढत्या क्षेत्रासंबंधीची माहिती उपस्थितांना करून दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योजक बनून आपले जीवनमान यशस्वी करा असा कानमंत्र दिला. त्याचे सत्कार समारंभाचे भाषण फारच उद्बोधक होते. परिषदे दरम्यान श्री. टी. वासू तसेच डॉ. व्ही.व्ही. बेडेकर यांनी आपले विचार मांडले.

प्रा. सौ. सुहासिनी शुक्ला (विभाग प्रमुख Computer Engineering तंत्रनिकेतन, ठाणे) यांनी संघटन सचिव म्हणून काम पाहिले व शेवटी त्यांनी उपस्थितांचे आभार मानले.

●●●

मुखपृष्ठावरून
संपादकीय
**शिक्षण आणि सामाजिक संस्था**

टोकाच्या स्वार्थी भूमिकेमुळे ढासळत चाललेली कुटुंब व्यवस्था, शिक्षण क्षेत्रामध्ये वाढत चाललेली अतिरिक्त स्पर्धा, माध्यमांमधून केल्या जाणाऱ्या विवेकहीन जाहिराती आणि आर्थिक विषमता हे होत.

हा अहवाल सादर करणाऱ्या अभ्यासगटाने व्यक्तिस्वातंत्र्याचा अतिरेक हा ही मुद्दा मांडला आहे. तो महत्त्वाचा आहे. ही ढासळती परिस्थिती सावरायची असेल तर मूल्यव्यवस्थेची गरज आहे, असे अहवाल सादर करणाऱ्या अभ्यासगटाला सुचवायचे आहे. बारा वर्षांखालील मुलांचा गट डोळ्यांसमोर ठेवत केल्या जाणाऱ्या जाहिराती बंद कराव्यात, दूरदर्शनवरून प्रसारित होणाऱ्या घातक खाद्य पदार्थ व मद्याच्या जाहिरातींवर वेळेची बंधने घालावीत, मुलांच्या खेळण्याच्या ज्या मोकळ्या जागा आहेत, त्यावर बांधकामे करू नयेत असे काही उपाय या अहवालात आहेत. त्यातील 'अनप्रिन्सिपल्ड ॲडव्हर्टायझिंग' हे शब्द फार महत्त्वाचे आहेत. केवळ पाश्चात्त्य जगातच नव्हे तर जगभरच जाहिरातींच्या माऱ्याचे घातक परिणाम मोठ्या प्रमाणात जाणवत आहेत. शिक्षण हे प्रसार माध्यमांचे प्रमुख कार्य आहे या म्हणण्यात तथ्य असेल तर, हे शिक्षण 'घडवणारे' की, बिघडवणारे. असा प्रश्न पडावा असे चित्र आहे.

या अहवालात नोकरी करणाऱ्या मातांचा प्रश्न, घटस्फोटित दांपत्याच्या संततीचा प्रश्न हे मुद्देही आहेत. या संदर्भातील एका निष्कर्षात असे म्हटले आहे की, 'बालसंगोपन हे अतिशय आव्हानात्मक काम आहे व त्यासाठी दोन व्यक्तींची (अर्थात, आई व वडील) गरज आहे.' घटस्फोटांचे वाढते प्रमाण विद्यार्थी जीवनातील वैफल्यग्रस्तता वाढवत आहे. घटस्फोटांमागे अनेक गुंतागुंतीची कारणे असू शकतात. त्यातील महत्त्वाचे कारण 'टोकाची व स्वार्थप्रेरित' व्यक्तिकेंद्री विचारसरणी हे आहे. उपभोगाची लालसा, सुखाच्या चुकीच्या कल्पना यांतून हे सर्व घडते. या पार्श्वभूमीवर लग्न संस्थेच्या भवितव्याबद्दल जगभर केली जाणारी काळजी समजू शकते.

विवाह हा संस्कार मानणाऱ्या पौर्वात्य जीवन पद्धतीतील विचारांचा श्रेष्ठपणाही या पार्श्वभूमीवर ठळकपणे जाणवतो. आत्महत्या, वैफल्य, व्यसनधीनता यांचे प्रमाण इतके वाढत असेल तर 'उद्याची आशा' असणाऱ्या युवा पिढीबद्दल प्रत्येकाने गांभीर्याने विचार करायला हवा. ब्रिटन, युरोपियन देश काय, अमेरिका काय आणि पूर्व गोलार्धातील देश काय, सर्वत्रच याबद्दल विचार केला जायला हवा. शाळांमध्ये विद्यार्थी खून करतात. क्रोधावर त्यांचे नियंत्रण राहत नाही. टोकाच्या व्यक्तिवादी संस्कारात ते वाढतात. त्यांच्या सुखाच्या कल्पना विकृत बनत जातात. व्यसनाधीनतेला सामाजिक प्रतिष्ठा मिळते. हे सर्व भयावह आहे. स्पर्धेतील लहान सहान अपयशही ही मुले सहन करू शकत नाहीत. परीक्षांचा ताण येऊन यांचे वागणे बिघडते, या परिस्थितीला सामाजिक परिस्थिती कारणीभूत आहे.

सामाजिक अध:पतनाची सर्व कारणे ज्या मूलभूत बाबींशी संबंधित आहेत ती बाब शिक्षण ही आहे. त्यामुळे शिक्षणाचे संदर्भही वारंवार तपासले जायला हवेत. शिक्षणाकडे सकारात्मक बदल घडवण्याची क्षमता असणारे क्षेत्र म्हणून पहायला जायला हवे आणि त्याची सुरुवात कुटुंबातूनच व्हायला हवी.

**डॉ. विजय बेडेकर**

●●●

# गीता संदेश

✧ कशाला व्यर्थ चिंता करीत आहेस? कुणाला घाबरतो आहेस? तुला कुणीही मारू शकत नाही. आत्मा अमर आहे.

✧ जे झाले आहे, जे होत आहे आणि जे होणार आहे ते सारे ईश्वरेच्छेने होत असल्याने ठीक आहे. गतकाळाचा पश्चाताप नको, भविष्याची चिंता नको. वर्तमानातच जग!



✧ तुझे काय गमा**वले** **म्हणून** तू शोक करीत आहेस? तू काय घेऊन आला होतास? **तू** **स्व**तःचे असे काय निर्माण केलेस? जे मिळविलेस **ते** परमेश्वराकडूनच मिळविलेस. जे गमावलेस ते या भगवद्भूमीमधीलच होते. तू रिकाम्या हाताने आला आहेस व रिक्तहस्ते जात आहेस! तुझे असे काही नव्हते आणि असणारही नाही. तेव्हा या नश्वर गोष्टींना **माझे** समजून वृथा शोक करू नकोस!

✧ माया परिवर्तनशील आहे. संसार क्षणभंगुर आहे. एका क्षणात दरिद्री कोट्याधीश होतो. करोडपती भिक्षाधीश होतो. मृत्यूही जीवन आहे. जीवनात मृत्यू आहे. लहान थोर, आप-पर सारे भेद मनातून नष्ट कर. सारे तुझे आहे. तू सर्वांचा आहेस!

✧ तू शरीर नाहीस, शरीर तुझे नाही. तू शरीराचा नाहीस. शरीर हा पंचभूतांचा मिलाफ आहे. त्यातील आत्मा हाच शाश्वत आहे!

✧ स्वतःचे सर्वस्व भगवंताचे ठायी तू समर्पण कर. तोच एक आश्रयस्थान, शरण्यधाम आहे. त्याला जाणून तू भय, शंका, शोक दुःखातून मुक्त हो. प्रत्येक कर्माची 'हरि ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु' या भावनेने भगवंताचे चरणी आहुती दे. हा कर्मयोगाचा महान यज्ञ आहे यातच जीवन मुक्तीचे सार आहे.

✧ गोविंद परमानंद, शामसुंदर, नंदकुमार! तू एक महासागर आहे. मी एक बिंदू आहे. तू मला आपल्या अंतरात समावून घे.

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

☆ *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
☆ *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
☆ *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*
*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नांव | ठिकाण | आसन क्षमता |
| --- | --- | --- |
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा.ना.बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

☆ **संपर्क** ☆

कार्यवाह
**विद्या प्रसारक मंडळ**
विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.